
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ८९
www.ramprahar.com
◆ गुरुवार, १६ ऑक्टोबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## रायगड जिल्ह्याच्या काही भागांमध्ये पावसाची हजेरी



**रोहा :** रायगड जिल्ह्यातील काही भागांमध्ये बुधवारी (दि. १५) पावसाने हजेरी लावली. त्यामुळे दिवाळीच्या पार्श्वभूमीवर खरेदीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. दुसरीकडे, शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे. सायंकाळच्या सुमारास सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडला, तर काही ठिकाणी शिडकावा झाला. जिल्ह्यात सकाळपासूनच वातावरण ढगाळ होते. सायंकाळी पावसाने बरसात केली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. दीपावलीनिमित्ताने बाजारपेठेत फटाक्यांचे स्टॉल, दुकाने लावण्यात आली आहेत. पावसामुळे त्यांचे नुकसान झाल्याचे दिसून आले. सध्या मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू आहे. अशातच हवामान खात्याने वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे दिवाळी सणात पावसाची वाटचाल कशी असणार याकडे सर्वांचे लक्ष असेल.

### अंतरंग
तळोजात भटक्या कुत्र्यांची दहशत; पाच जण जखमी/२
मुरूडमध्ये माकडांचा उच्छाद; सारेच त्रस्त/७
'मिशन ऑस्ट्रेलिया'साठी टीम इंडिया रवाना/८

# इतके गोंधळलेले विरोधक आयुष्यात पाहिले नाहीत!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा निशाणा

**सोलापूर : प्रतिनिधी**

मतदार यादीत घोळ असल्याचा आरोप करीत राज्यातील महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मंगळवारी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यानंतर बुधवारी (दि. १५) पुन्हा निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाऊन विविध मागण्या केल्या. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रसारमाध्यमांनी विचारले असता, त्यांनी मी इतके गोंधळलेले विरोधक आयुष्यात पाहिले नाहीत, असे म्हटले आहे.

महाविकास आघाडीचे नेते उद्धव ठाकरे, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील तसेच मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे आदी नेत्यांनी बुधवारी विरोधी पक्षांची निवडणुकांबाबतची भूमिका मांडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची भेट घेतली. त्यानंतर संयुक्त पत्रकार परिषद झाली. या वेळी सर्वांनीच मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचे सांगत घोळ संपत नाहीत तोपर्यंत म्हणजे किमान पुढचे सहा महिने निवडणुका घेऊ नये, अशी मागणी केली आहे.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, इतके कन्फ्युज्ड विरोधक मी माझ्या आयुष्यात पाहिलेले नाहीत. इतके मोठमोठे लोक त्यांना कुणाकडे गेले पाहिजे? कायदा काय सांगतो हे माहीत नाही असे नाही, पण केवळ पर्सेप्शन क्रिएट करण्यासाठी म्हणजे निवडणुकीत हरलो तर आधीच ते पर्सेप्शन तयार करत आहेत. विरोधक निवडणूक आयुक्त चोकलिंगम यांच्याकडे गेले होते. त्यांच्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे काहीच नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वेगळा कायदा आणि दिनेश वाघमारे यांच्या नेतृत्वात वेगळे कमिशन आहे. काल सगळे महाभाग चोकलिंगम यांना भेटले. यांना भेटल्यावर त्यांना कळले की, दिनेश वाघमारेंना भेटायचे होते. मग काहीतरी थातूरमातूर उत्तरे देऊन आज वाघमारे यांना भेटले. तिथे काय मागणी करायची हेदेखील विरोधकांना समजले नाही.



राज्याचा जो निवडणूक आयोग आहे तो निवडणुका घेतो. मतदार याद्यांच्या संदर्भात ते जी यादी आहे ती ॲडॉप्ट करतात. त्यावर हरकती, सुधारणांची संधी दिली जाते. जर यांच्याकडे पुरावे असतील तर त्या कालावधीत ते विरोधकांनी दिले पाहिजेत, मात्र तेव्हा तक्रार, हरकत न घेता आता काही तरी नरेटिव्ह पसरविण्यासाठी विरोधकांकडून मतदार याद्यांमध्ये घोळ असल्याचे पुढे केले जातंय, जे हास्यास्पद आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### कुणी कुणासोबत गेले तरीही महायुतीच निवडून येणार

कुणालाही कुठेही जाता येईल. कुणीही कोणासोबत गेले तरीही महायुतीच निवडून येणार, कारण महाराष्ट्राची जनता महायुतीच्या पाठिशी आहे. आम्हाला हे माहीत आहे की, आम्ही निवडून आल्यानंतर पुन्हा हे आताचे फोटो दाखवून बघा आम्ही सांगितले होते व्होटर लिस्टमध्ये गडबड आहे, असे सगळे करणार आहेत. त्यांना रडण्याची सवय आहे. त्यामुळे काही हरकत नाही, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी विरोधकांना लगावला.

मी आज कार्यक्रमांमध्ये होतो. विरोधक काय म्हणाले ते मी काही ऐकले नाही. मी एवढे ऐकले की, कुणीतरी आम्हालाही आवाहन केले आहे. आमचीही सगळे काही सहकार्य करण्याची तयारी आहे. निवडणुका चांगल्या झाल्या पाहिजेत. मतदार याद्यांमध्ये सुधारणा करायची असेल तरीही आमचा पूर्ण पाठिंबा आहे. आमची त्या गोष्टीलाही ना नाही. मतदार याद्यांमध्ये काही ठिकाणी डुप्लिकेट नावे आहेत ती आज आहेत का? २० वर्षे झाली ती आहेत. तुम्ही सत्तेत इतकी वर्षे होतात तेव्हाही तेच होतं. आम्ही कितीवेळा आक्षेप घेतला आहे. त्यामुळे एक काही तरी काढून हेच कसं आणि तेच कसं विचारत आहेत. मला वाटते की, विरोधकांनी पराभव स्वीकारावा, जनतेत जावं आणि पुन्हा निवडणुकीला सामोरे जावं, पण यांचा कुणाचाही संविधानावर, संविधानाने तयार केलेल्या नियमांवर, संस्थांवर विश्वास नाही. फक्त नरेटिव्ह पसरण्याचे काम आहे. दोन दिवसांच्या त्यांच्या चकरा म्हणजे फियास्को आहेत. यातले सगळे काही ज्येष्ठ नेते शरद पवार यांना कळते. त्यामुळेच ते तिथे गेले नाहीत, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विविध विकासकामे

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या सुमारे चार कोटी ८८ लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.१५) झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये अनेक विकासाची कामे मार्गी लागत असून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यानुसार नितळस येथे तीन कोटी चार लाख ९९ हजार रुपये निधीतून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत इजिमा २१ ते नितळस रस्ता काँक्रीटीकरण, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या १६ लाख ८६ हजार ४३४ रुपये निधीतून व्यायामशाळा तसेच महापालिकेच्या एक कोटी ६६ लाख ४७ हजार ६५१ रुपये निधीतून किरवली येथे भरत पाटील यांच्या घरापासून ते जितेंद्र तरे यांच्या घरापर्यंत आणि भरत पाटील यांच्या घरापासून ते मंदिरापर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. **(पान २ वर..)**

## आदिवासींच्या प्रश्नांवर आमदार महेश बालदी यांनी घेतली मंत्री डॉ. अशोक उईके यांची भेट



**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील आदिवासी नागरिकांना भेडसावणाऱ्या रस्ते, पाणी, वीज, घरकुल आदी मूलभूत सुविधांच्या प्रश्नांबाबत राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांची आमदार महेश बालदी यांनी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

या चर्चेदरम्यान आमदार बालदी यांनी आदिवासी भागातील लोकांच्या अडचणींचा वेध घेत तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. मंत्री डॉ. उईके यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे तसेच बोरगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रितेश मोरे उपस्थित होते.

## जहाल नक्षली भूपतीचे ६० साथीदारांसह मुख्यमंत्री फडणवीसांसमोर आत्मसमर्पण



**गडचिरोली : प्रतिनिधी**

नक्षल चळवळीला मोठा धक्का बसला आहे. माओवादी कम्युनिस्ट पक्षाचा केंद्रीय समिती सदस्य तथा पॉलिट ब्युरो सदस्य मल्लोजुला वेणुगोपाल ऊर्फ भूपती याच्यासह ६१ नक्षलवाद्यांनी बुधवारी (दि.१५) गडचिरोली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमक्ष आत्मसमर्पण केले. या सर्वांचे संविधानाची प्रत देऊन लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, महानिरीक्षक संदीप पाटील, छेरिंग दोरजे उपस्थित होते. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या प्रयत्नातून ६१ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसर्मपण केले, ही नक्षलवाद समाप्तीची सुरुवात आहे. या लढाईचे नेतृत्व गडचिरोली जिल्हा करतोय ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे.



**पनवेल : युनिव्हर्स कराटे मार्शल आर्ट अकॅडमी इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय खुल्या कराटे स्पर्धेत उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या कराटेपटूंनी चमकदार कामगिरी केली. प्रिनल भालेराव व मोहम्मद इफराज शेख या दोघांनी काता प्रकारात कांस्यपदक पटकाविले. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख यांनी अभिनंदन केले. या वेळी प्राचार्य किरणकुमार सुथार, क्रीडा प्रशिक्षक मंदार मुंबईकर आदी उपस्थित होते.**

## भाजपतर्फे खारघर, कळंबोली, कामोठे येथे 'दिवाळी संध्या'




### सुप्रसिद्ध गायक स्वप्नील बांदोडकर, आर्या आंबेकरसह इतर गायकांच्या सुरेल गीतांची पर्वणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या दिवाळी संध्या या सांस्कृतिक मेजवानीचे दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षातर्फे खारघर, कळंबोली आणि कामोठे परिसरात भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमधून गायन क्षेत्रातील दिग्गज कलाकारांच्या बहारदार गायनाचा मनमोहक आस्वाद रसिकांना मिळणार आहे.

खारघर भाजपच्या वतीने येत्या शनिवारी (दि. १८) सायंकाळी ७ वाजता खारघरमधील गावदेवी मैदानावर, तर रविवारी (दि. १९) सायंकाळी ७ वाजता रोडपाली बस डेपो सेक्टर १६ कळंबोली येथे होणाऱ्या दिवाळी संध्या कार्यक्रमात राधा ही बावरी फेम सुप्रसिद्ध गायक स्वप्नील बांदोडकर, गायक के. शिरीष, गायिका गुल सक्सेना आणि सपना हेमन या प्रसिद्ध गायकांच्या गीतांचे सादरीकरण होणार आहे, तर कामोठे भाजपच्या वतीने बुधवारी (दि. २२) सायंकाळी ७ वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय सेक्टर ६ कामोठे येथील दिवाळी संध्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेती सुप्रसिद्ध गायिका आर्या आंबेकरची मैफिल अनुभवायला मिळेल.

भाजपतर्फे दरवर्षीप्रमाणे दिवाळी सणाच्या निमित्ताने संगीत, संस्कृती आणि कलेचा संगम साधणारी ही 'दिवाळी संध्या' रसिकांसाठी खऱ्या अर्थाने सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे. या कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संगीताचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## पनवेलच्या एमसीसीएच सोसायटी मैदानावर शनिवारी दीपोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीच्या स्वागताप्रित्यर्थ पनवेलमधील एमसीसीएच सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने दीपोत्सव २०२५ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन येत्या शनिवारी (दि. १८) एमसीसीएच सोसायटीच्या मैदानावर करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विविध प्रकाशमय उपक्रमांसह इतिहासप्रेरक व्याख्यान होणार असून पनवेलकरांसाठी हा सांस्कृतिक सोहळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

कार्यक्रमाचा शुभारंभ सायंकाळी ६.३० वाजता उद्घाटन समारंभाने होणार असून यानंतर आकर्षक फायरवर्क्स आणि लाईट शोद्वारे दीपोत्सवाची रंगत वाढविण्यात येईल. त्यानंतर ७ वाजता शिवव्याख्यान आयोजित करण्यात आले असून प्रसिद्ध वक्ते सुदर्शन शिंदे हे छत्रपती शिवाजी महाराज आणि गडकोट विषयावर प्रेरणादायी व्याख्यान देतील.

या कार्यक्रमाचे आयोजक पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, एमसीसीएच सोसायटीचे अध्यक्ष उद्योजक राजू गुप्ते आणि एमसीसीएच सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष भाजपचे पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव आहेत. **(पान २ वर..)**



# दिवाळीसाठी अन्न व औषध प्रशासन सज्ज

## दुग्धजन्य पदार्थांवर एफडीएची नजर ▌ग्राहकांनाही खरेदी करताना सजग राहण्याचे आवाहन

**पनवेल : वार्ताहर**

सणासुदीच्या काळात मिठाई, फराळ आणि गोड पदार्थांची मागणी वाढते, मात्र या काळात दुग्धजन्य पदार्थात भेसळ होण्याची शक्यता जास्त असल्याने अन्न व औषध प्रशासनाने सणासुदीसाठी विशेष तपासणी मोहीम राबवण्यास सुरुवात केली आहे. या मोहिमेचा उद्देश नागरिकांना चांगल्या प्रतिची मिठाई व फराळ उपलब्ध होणे हा आहे, मात्र ग्राहकांनीही मिठाई खरेदी करताना सजग राहण्याचे आवाहन एफडीए प्रशासनाने केले आहे. याशिवाय, मिठाईची मुदत संपण्याची ही तारीख त्यावर लिहावी असे आवाहन करण्यात आले आहे.



मिठाई व गोड पदार्थ नाशवंत असतात, त्यामुळे त्यांचे उत्पादन, साठवणूक, मुदतबाह्य तारीख आणि कच्च्या मालाची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. एफडीएने यावर विशेष लक्ष देत तळण्यासाठी एकाच तेलाचा वापर, कृत्रिम रंग निर्धारित मात्रेपेक्षा जास्त न वापरणे आणि स्वच्छतेच्या निकषांचे पालन झाले आहे का, याची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत २५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा या नावाने विशेष तपासणी मोहीम राबविणार आहे.

या मोहिमेत राज्यात नमुने गोळा करण्यासोबत नागरिकांना प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतून मार्गदर्शन करण्याचे प्रयत्न होणार आहेत. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांवर देखील लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. दुधामधून भेसळ रोखणे, पनीरसदृश्य अनालॉग वापर टाळणे आणि गुणवत्तेची नियमित तपासणी करणे या उपाययोजनांमध्ये समावेश आहे.

या माध्यमातून कोलेस्ट्रॉल वाढणे, वजन वाढणे आणि आरोग्याशी संबंधित समस्या होऊ नयेत, असा प्रयत्न आहे. मोहीम दरम्यान नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत तक्रारी टोल-फ्री क्रमांक १८००- २२२-३६५ वर कळवता येतील. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी पुरवठा कमी आणि मागणी जास्त असतानाही भेसळ टाळण्यासाठी नागरिक, अन्न व्यवसायिक आणि शासनाने एकत्र काम करावे, असा आग्रह धरला.


# तळोजा गावात कुत्र्याची दहशत

## पाच जणांवर चढवला हल्ला

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा गावात भटक्या कुत्र्याने अक्षरशः दहशत माजवत अवघ्या २० मिनिटांच्या कालावधीत पाच जणांवर हल्ला चढवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात चार लहान मुलाझसह एकूण पाच जण गंभीर जखमी झाले असून यातील दोन लहान मुलाची प्रकृती चिंताजनक आहे. वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. हा धक्कादायक प्रकार सीसीटीव्ही कॅमे-यात कैद झाला आहे. या घटनेमुळे तळोजा गावातील पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

कुत्र्याच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेला तीन वर्षीय मुस्तफा हा आपल्या घराच्या दरवाजाजवळ उभा असताना, अचानक त्याठिकाणी आलेल्या एका भटक्या कुत्र्याने मुस्तफावर झडप घालुन त्याच्यावर हल्ला चढवला. हा सर्व भयावह प्रकार मुस्तफाच्या १७ वर्षीय बहिणीसमोर घडला. तिने कुत्र्याला हुसकावुन लावल्यामुळे मुस्तफा यातून बचावला. या हल्ल्यात मुस्तफा गंभीर जखमी झाल्याने त्याला तातडीने मुंबई



येथील नायर रुग्णालयात दाखल न करण्यात आले आहे. कुत्र्याच्या हल्लूयात मुस्तफाच्या ओठावर तसेच चेहऱ्यावर अनेक खोल जखमा झाल्या आहेत. त्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर पुर्नरचना शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती नायर रुग्णालयातील डॉक्टरांनी दिली.

दरम्यान, याच कालावधीत तळोजा गावातील सात वर्षीय इसा गुलबर हा त्याच्या घराजवळ असलेल्या के मेडीकलच्या दुकानात औषध खरेदीसाठी गेला असताना, सदर भटक्या कुत्र्याने अचानक त्याच्यावर देखील झडप घातली. या वेळी सदर कुत्र्याने इसा याचा चावा घेण्यास सुरुवात केली असताना, आजूबाजूच्या लोकांनी दगड मारुन सदर कुत्र्याला हुसकावून लावले, अन्यथा कुत्र्याने त्याचेही लचके तोडले असते, असे इसा गुलबर याचे वडील मुबाशीर यानी सांगितले. ईसा गुलबर याच्यावर सध्या वाशी येथील महापालिकेच्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. त्याच्यावरदेखील शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे.

या भटक्या कुत्र्याने आणखी दोन मुले व एका व्यक्तीवर देखील अशाच पद्धतीने हल्ला केला आहे, मात्र त्यातून ते थोडक्यात बचावले असले तरी ते देखील या कुत्र्यांच्या हल्लूयात किरकोळ जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर भटक्या – कुत्र्यांच्या त्रासावर पुन्हा एकदा चर्चा सुरु झाली आहे. भटक्या कुत्र्याने लहान मुलांवर हल्ला केलेल्या परिसरात शाळा आणि धार्मिक स्थळे असल्यामुळे त्या भागात नेहमी मुलांची व नागरीकांची गर्दी असते. त्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी झालेल्या मुलांच्या कुटुंबियांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे गावात फिरणे धोकादायक झाल्याचे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे. त्यामुळे येथील रहिवाशांनी या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.१५) ग्रंथालय समितीच्या तर्फे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे व भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनचरित्रातून प्रेरणा घेणे हे होते. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी उपस्थित राहून भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्यांच्याविषयी विचार मांडले तसेच यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी देखील उपस्थित राहून प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली.

या वेळी ग्रंथपाल समाधान बेहेरे यांनी डॉ अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्यावर आणि वाचन प्रेरणा दिवस याविषयी अनमोल माहिती विद्यार्थ्यांना सांगितली तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय लागावी यासाठी ग्रंथप्रदर्शन हा उपक्रम राबविण्यात आला असे नमूद केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर समन्वयक ग्रंथालय समिती यांनी केले तसेच समितीतील इतर सर्व सदस्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. विशाल देशमुख यांनी सर्वांचे आभार मानले.

# डोळवली येथील कंपनीत चोरट्यांचा दरोड्याचा प्रयत्न

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली कर्जत मार्गावरील डोळवलीजवळ असणाऱ्या झोराबियन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत १५ ऑक्टोबरच्या पहाटेच्या सुमारास जवळपास १० अज्ञात चोरट्याने शिरकाव करत सुरक्षारक्षकाला एका बंद खोलीत डाबून कंपनीच्या मुख्य ऑफिसचे लॉक तोडून आता प्रवेश करीत आतमधील साहित्याची तोडफोड करत कॅमेराचे डीव्हीआर आणि रोख रक्कम लंपास केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहेत.

चोरटे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले असून पुढील अधिक तपास खालापूर पोलीस करीत असून दरोडा टाकण्यासाठी आलेल्या चोरट्यांमध्ये एक जण पोलीस गणवेशात असल्याने यामध्ये कोण कोण सामील आहे याचा शोध खालापुर पोलीस घेत आहेत.

कर्जत खोपोली मार्गावरील मार्गावरील डोळवली नजदीक असणाऱ्या झोराबियन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत जवळपास १० अज्ञात चोरट्याने शिरकाव करत सुरक्षा रक्षकाला एका बंद खोलीत डाबून कंपनीच्या मुख्य ऑफिसचे लॉक तोडून आता प्रवेश करीत आतमधील साहित्याची तोडफोड करत कॅमेराचे डीव्हीआर आणि रोख रक्कम लंपास केली.

चोरट्यांनी कंपनीच्या प्रवेशद्वारासमोरील कॅमेरे विरुद्ध दिशेने करत ही चोरी करण्याचा प्रयत्न केला तरी चोरटे सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे. यातील एक चोरटा पोलीस गणवेशात असल्याचे सीसीटीव्ही कॅमेरा दिसून आले असून चोरट्यांना शोधणे खालापूर पोलिसांसमोर आव्हान बनल्या असून या घटनेचा पुढील अधिक तपास खालापूर पोलीस करत आहेत.

# कर्जतमध्ये अग्निशमन केंद्राजवळ बस निवारा शेड उभारणार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत ते नवी मुंबई प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी ही दिवाळी विशेष ठरणार आहे. कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या आमदार निधीतून सुनील गोगटे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे कर्जत अग्निशमन केंद्र येथे आधुनिक बस निवारा शेड उभारण्यात येणार आहे.

गेल्या १ ऑगस्ट २०२५पासून बेलापूर ते कर्जत अग्निशमन केंद्र या मार्गावर नवी मुंबई परिवहन मंडळाची बससेवा सुरू झाली असून, या मार्गावर दिवसातून तब्बल ३२ फेऱ्या होतात. या सेवेचा मोठा लाभ कर्जतकरांना विशेषतः नवी मुंबईकडे नोकरी वा शिक्षणासाठी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होत आहे मात्र ज्या ठिकाणी बस थांबा आहे, तेथे उन्हा, पावसापासून संरक्षण करणारा निवारा किंवा बसण्याची सुविधा नसल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर सुनील गोगटे यांनी आमदार निरंजन डावखरे यांच्याकडे बस निवारा शेड बांधण्यासाठी आमदार निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली.

या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार निरंजन डावखरे यांनी तातडीने दहा लाखांचा निधी मंजूर करून तो जिल्हा नियोजन कार्यालयाकडे वर्ग केल्याचे पत्र प्राप्त झाले आहे. या कामाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक देखभाल, दुरुस्ती आणि जागा उपलब्धतेसंबंधीचे निवेदन सुनील गोगटे यांनी कर्जत मुख्याधिकारी तानाजी चव्हाण यांना सादर केले. लवकरच हा बसथांबा अत्याधुनिक आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर अशा पद्धतीने उभारला जाणार आहे.

या निर्णयामुळे नवी मुंबईकडे प्रवास करणाऱ्या विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाची मोठी सोय होणार असून ही सुविधा कर्जतकरांसाठी एक आनंदाची आणि उपयुक्त दिवाळी भेट ठरणार आहे, अशी माहिती सुनील गोगटे यांनी दिली.

# पत्नीसह सासू बेपत्ता असल्याची तक्रार

**पनवेल :** पत्नीसह सासू राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने त्या दोघी हरविल्याची तक्रार पतीने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे. नारायण पाटील (वय ५५, रा.डेरवली) यांची पत्नी जयश्री पाटील (वय ४६) व सासू हौशाका विठ्ठल कोकणे (वय ६८) या दोघी राहत्या घरातून कोणास काही



एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने त्या दोघी हरविल्याची तक्रार पतीने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दिली आहे. जयश्री पाटील या अंगाने मजबूत, चेहरा गोल, केस काळे, वर्ण गोरा, डोळे काळे, नाक सरळ, उंची पाच फुट असून, डाव्या गालावर तिळ आहे. त्यांच्या अंगावर लाल गाऊन, गळ्यात मंगळसूत्र व मोबाईल फोन आहे. तर हौशाका कोकणे या अंगाने सडपातळ चेहरा उभट, केस पांढरे, वर्ण गोरा, डोळे काळे, नाक सरळ, उंची पाच फुट असून डाव्या गालावर तिळ आहे. त्यांच्या अंगात हिरव्या रंगाची सहावारी नक्षीची साडी घातलेली आहे. दोघींबाबत कोणाला माहिती असल्यास तालुका पोलीस ठाणे किंवा पो.हवा.अण्णासाहेब हसबे (९८६७१३६८७६) यांच्याशी संपर्क साधावा.

# गव्हाण विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांचे हस्ते भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील,रयत शिक्षण संस्थेचे आजिव सेवक देवेंद्र म्हात्रे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, ज्युनिअर कॉलेज शिक्षिका करूणा तांडेल, ग्रंथपाल महेश म्हात्रे, इयत्ता ६ ब या वर्गाच्या वर्गशिक्षिका माधुरी म्हात्रे, प्रतिज्ञा घरत, गितांजली म्हात्रे, मोनाली कोडग आदि उपस्थित होते. इयत्ता सहावी ब ह्या वर्गाचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेत श्रीधर



सुतार, मंजिरी ठाकूर, नेहाली कोळी ह्या विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

डॉ.ए.पी.जे.कलाम यांचा जयंती दिन 'वाचन प्रेरणा दिन' म्हणूनही साजरा करण्यात येतो. तत्प्रित्यर्थ ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. इयत्ता सहावी ब या वर्गाच्या वतीने साजरा करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावर आधारित पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली.

या वेळी विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनातील काही प्रसंग सांगून वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. या वेळी त्यांचेसह सहावी ब च्या वर्ग शिक्षका माधुरी म्हात्रे व ज्येष्ठ शिक्षक प्रमोद करावकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# नोकरभरती निर्णयाबाबत 'आरसीएफ'चे स्पष्टीकरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेडने (आरसीएफ) थळ प्रकल्पामध्ये प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. आरसीएफवर यापुढे कोणत्याही अतिरिक्त प्रकल्पग्रस्तांना रोजगार देण्याची कायदेशीर बंधनकारकता उरत नाही, असे अंतरिम आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत, त्यामुळे प्रकाल्पग्रास्तांना नोकरी देण्याचा निर्णय आरसीएफ प्रशासनाला घेता येणार नाही, असे आरसीएफने एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

आरसीएफ थळ प्रकाल्पग्रास्तांचे मंगळवारपासून (दि.१४) आरसीएफ प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन आरसीएफ थळ प्रकल्पाच्या मुख्य प्रवेश द्वारासमोर आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे. मंगळवारी रास्तारोको करण्यात आले. आजपासून साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आरसीएफ प्रशासनाने आपली बाजू स्पष्ट केली आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीसंदर्भातील न्यायालयीन प्रक्रिया अद्याप सुरू. या बाबत अंतिम निकाल लागलेला नाही, आरसीएफ थळ प्रशासनाने प्रसिद्धी केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# भिशीच्या नावाखाली फसवणूक करणारी महिला अटकेत

**रसायनी : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील भिशीच्या नावाखाली लोकांची फसवणूक करणाऱ्या संगणिका मानकामे यांना अटक केली आहे. त्यांना पनवेल येथील विशेष कोर्टात हजर केले होते.

याचा तपास रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव हे करतो असून अप्पर पोलीस अधीक्षक विशाल नेहुल व रसायनी चे पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनात पुढील तपास करत आहेत.

याबाबत पोलिसांनी सांगितले आहे की, जनतेला अपील केले आहे या बाबतीत पुढे येवून तक्रार केली पाहिजे, म्हणजे अजून किती लोकांना फसवले आहे हे पुढे येईल व अधिक तपास करता येईल.

# सीकेटी विद्यासंकुलात वाचन प्रेरणा दिन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसानिमिताने सीकेटी इंग्रजी विद्यालयात आणि मराठी प्राथमिक विद्यालयात उत्साहामध्ये साजरा करण्यात आला.

कार्यक्रम शाळेच्या अद्ययावत व सुसज्ज अशा ग्रंथालयामध्ये साजरा केला गेला. प्रास्ताविक शिक्षिका मनीषा नारखडे यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये शाळेच्या इयत्ता आठवीमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच शाळेच्या ग्रंथालयामधील ग्रंथपाल



सूर्यकांत घोडेकर, रूचिता घोलप मॅडम, निलेशा पाटील, आणि शिल्पा पाटीलसुद्धा या कार्यक्रमास उपस्थित होते.

इंग्रजी माध्यम विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कमीत कमी प्रत्येक महिन्याला एक पुस्तक वाचावे असे आपले वर्षभरामध्ये १२ पुस्तके वाचून होतील त्यामुळे वाचनाची आवड आपसुकच आपल्यामध्ये निर्माण होईल.

मराठी प्राथमिक विभागातील इयत्ता चौथीचे विद्यार्थी या उपक्रमात उस्फूर्तपणे सहभागी झाले. या वेळी मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर उपस्थित होते.

पान १ वरुन

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विविध विकासकामे






या सर्व विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. भूमिपूजनावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, नितेश पाटील, यतीन पाटील, चाहूशेठ पाटील, तालुका चिटणीस सचिन पाटील, विनोद पाटील, राम पाटील, बाळकृष्ण पाटील, दीपक उलवेकर, भास्कर आगलावे, राजेंद्र गोंधळी, शैलेश माळी, नासीर शेख, उल्हास पाटील, अशोक साळुंखे, राजेश पाटील, नवनाथ खुटारकर, कैलास मढवी, गुरूनाथ पावशे, बाळू काठे, रूपेश पावशे, दशरथ पावशे, धर्मा पावशे, बळीराम काठे, ग्रामपंचायत सदस्य दर्शना पावशे, सुमिता काठे, सुरेखा सांगडे, अरुण पाटील, सुनील पाटील, अनंता पाटील, कैलास गायकर, हरिश्चंद्र पाटील, गणेश पाटील, पांडुरंग पाटील, सदाशिव पाटील, भगवान पाटील, बबन भोईर, आयुष पाटील, मानव पाटील, यशवंत पाटील, नितेश पाटील, जयदेव गायकर, शक्ती तांडेल, रूपाली काठे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# पनवेलच्या एमसीसीएच सोसायटी मैदानावर शनिवारी दीपोत्सव

दीपोत्सवाच्या निमित्ताने पनवेलकरांसाठी मनोरंजन, इतिहास आणि समाज एकात्मतेचा संगम अनुभवण्याची ही अनोखी संधी आहे. त्यामुळे नागरिकांना या सोहळ्यास उपस्थित राहून दीपोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पाणीपुरवठ्याबाबत भाजपने वेधले लक्ष

## खारघर, तळोजा परिसरातील जलपुरवठा सुरळीत ■ पदाधिकाऱ्यांच्या पाठपुराव्याला यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर आणि तळोजा परिसरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. या भागातील नागरिकांना दिलासा देणारा निर्णय सिडकोकडून घेण्यात आला असून, येत्या काही दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत होणार असल्याची अधिकृत माहिती लेखी स्वरूपात देण्यात आली आहे.

बेलापूर येथील सिडको भवनामध्ये बुधवारी या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, निर्दोष केणी, विनोद घरत, साजिद पटेल, आशा बोरसे, जगदीश घरत, सचिन वास्कर आणि संतोष पाटील यांनी नागरिकांच्या वतीने पाणी प्रश्नावर सिडको अधिकाऱ्यांशी चर्चा केली. या बैठकीला सिडकोचे अधीक्षक अभियंता पी.एम शेवतकर उपस्थित होते. बैठकीदरम्यान तळोजा फेज १ व २ तसेच खारघर सेक्टर २३, २७, ३०, ३४, ३५, ३६, ३९ आणि ४० या भागातील पाणीपुरवठा सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना



करण्याचा निर्णय घेण्यात आला. सिडकोने दिलेल्या लेखी पत्रानुसार, नवी मुंबई महानगरपालिकेकडून अतिरिक्त एमएलडी पाणीपुरवठा करण्यासाठी विनंती करण्यात आली आहे.

हेटवणे धरणातून मिळणाऱ्या पाण्याचा पुरवठा वाढविण्यासाठी मागणी नोंदविण्यात आली आहे. खारघर सेक्टर २६ मधील पंप हाउस येथे नवीन पंप बसविण्याचे काम प्रगतीपथावर असून ते पूर्ण झाल्यानंतर पुरवठा अधिक सुरळीत होईल, या निर्णयामुळे खारघर व तळोजा परिसरातील हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. भाजप पदाधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या सातत्याने पुढे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले होते. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, सिडकोने दिलेल्या लेखी पत्रानंतर स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याबाबत भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांनी सांगितले की, नागरिकांच्या हितासाठी आम्ही गेल्या अनेक दिवसांपासून सिडकोकडे मागणी करत होतो. अखेर सिडकोने सकारात्मक प्रतिसाद देऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्याची हमी दिली आहे. या निर्णयाबद्दल खारघर व तळोजा रहिवाशांनी भाजप पदाधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# प्रतिष्ठित सन्मानाबद्दल रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे अभिनंदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**




खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर यांचा जिल्हा परिषद अलिबाग आयोजित मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा गौरव सोहळ्यातील प्रतिष्ठित सन्मानाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सत्कार केला.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या अंतर्गत कार्यरत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर यांनी आणखी एक अभिमानास्पद टप्पा गाठला आहे. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या वतीने आर. सी.एफ. कॉलनी हॉल, कुरुळ, अलिबाग येथे आयोजित मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा गौरव सोहळ्यामध्ये या शाळेचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास अदिती तटकरे (महिला व बालविकास मंत्री), भारत गोगावले (उद्यान, रोजगार हमी योजना व खारजमीन विकास मंत्री), नेहा भोसले (मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद) आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत मुंबई विभागात (मुंबई, रायगड व ठाणे) प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर या शाळेचा पुन्हा एकदा जिल्हा परिषदेच्या वतीने सन्मान करण्यात आला. शिक्षण, नवोन्मेष आणि स्वच्छतेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल हा सन्मान देण्यात आला. शाळेच्या वतीने राहुल घरत, अनीता मिश्रा व चश्मिंदर कौर बक्षी यांनी गौरवचिन्ह आणि प्रमाणपत्र स्विकारले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर यांना अलिबाग येथे झालेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा गौरव सोहळ्या मधील सन्मानाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले. १४ ऑक्टोबर २०२५ रोजी शाळेला दिलेल्या भेटीदरम्यान त्यांनी शाळेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचे कौतुक केले आणि आर. टी.पी.एस. परिवार खारघर यांना नवकल्पनाशीलता, प्रामाणिकता व शैक्षणिक गुणवत्तेच्या वारशाला पुढे नेण्याचे मार्गदर्शन दिले.

प्राचार्या राज अलोनी यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे नेतृत्वासाठी आणि सातत्यपूर्ण पाठबळासाठी मनःपूर्वक आभार मानले.

# कामोठे परिसरात पाणीटंचाई; भाजपचे आंदोलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या वतीने बुधवारी सिडको कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. कामोठे शहराध्यक्ष विकास घरत यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन मोठ्या उत्साहात पार पडले.

शहर टँकरमुक्त करण्याची आणि नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याची प्रमुख मागणी करत भाजप पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कामोठेतील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असून, सिडको प्रशासनाकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्यामुळे भाजपने आक्रमक पवित्रा घेतला. आंदोलनादरम्यान कामोठे शहर टँकरमुक्त करा, पाणी आमचा हक्क आहे, सिडको जागे हो अशा घोषणा देण्यात आल्या,.

आंदोलनादरम्यान ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण कार्यकर्ते आणि विविध



सोसायटीतील प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी शहराध्यक्ष विकास घरत यांनी सिडको प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जर पाणी प्रश्न तातडीने सोडवला नाही, तर आम्ही आत्मदहनासारखे टोकाचे पाऊल उचलू. या विधानामुळे वातावरणात तणाव निर्माण झाला होता. भाजपच्या या आक्रमक भूमिकेमुळे अखेर सिडकोचे अधिकारी नरमले. त्यांनी बुधवारी संध्याकाळपर्यंत पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आणि पुढील काही दिवसात स्थायी उपाययोजना राबवण्याचे लेखी आश्वासन दिले. हे आश्वासन मिळाल्यानंतर शहराध्यक्ष विकास घरत यांनी आंदोलन स्थगित करण्याची घोषणा केली.

या आंदोलनादरम्यान भाजपचे पनवेल महानगरपालिकेचे माजी सभापती डॉ. अरुणकुमार भगत, भाऊ भगत, सुशील शर्मा, हर्षवर्धन पाटील, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, विद्या तामखेडे, दामोदर चव्हाण ,हर्षवर्धन पाटील, रवी गोवारी, तेजस जाधव यांच्यासह पदाधिकारी, माजी नगरसेवक, महिला मोर्चाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# कळंबोली शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करा

## प्रमिला पाटील यांची सिडकोकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली शहरामध्ये पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशा मागणीचे पत्र माजी नगरसेविका प्रमिला रविनाथ पाटील यांनी सिडकोच्या पाणीपुरवठा विभागातील कार्यकारी अभियंत्यांना दिले आहे.

प्रमिला पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे की, गेली अनेक महिन्यापासून कळंबोली शहरामध्ये प्रत्येक आठवड्यात किमान दोन दिवस तरी पाणी येत नाही आणि आलेच तर कमी दाबाने येते. या पाण्याच्या लपंडावाने येथील नागरीक त्रस्त झाले आहे. ऐन पावसाळ्यात अशी सिडकोची पाणी कपात होत असलेली पाहून सिडकोकडे नियोजन शुन्य कारभार आहे की काय किंवा कसे असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

दिवाळीच्या सणानिमित्त आम्ही नागरीकांना भेटण्यास (उटणे वाटप करण्यास गेलो असता पहिल्या अंघोळीसाठी पाणी द्या, असे अनेक प्रश्न आमच्यासमोर उपस्थित केले. आपल्या संस्थेमार्फत या दिवाळीच्या सणात व पाणीपुरवठा सुरळीत जर झाला नाही पाणीप्रश्न जर नागरिका पुढे उभा राहिला तर आम्ही संपूर्ण कळंबोली शहराच्या वतीने ठंडा मोर्चा काढू व सिडकोला टाळे ठोकू. आपण नागरीकांचे पाणी समस्यावर लवकरच मार्ग काढावा, अशी माफक अपेक्षा, प्रमिला पाटील यांनी नमुद केली आहे.



**पनवेल : भाजप उलवे नोड २ युवा मोर्चा अध्यक्ष विराज देशमुख यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे, माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, सुहास भगत, वैभव देशमुख, धीरज ओवळेकर, निलेश खारकर, सागर ठाकूर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांनी पक्षाच्या संघटनात्मक नियुक्त्यांची घोषणा केली आहे. त्यानुसार युवा मोर्चा नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्षपदी मयूर कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांना भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी विवेक होन, दीपक औटे, बाळकृष्ण गायकवाड, मोहित शर्मा, गोविंद जाधव, रवी रतक्पारखे, निलेश राठोड, अनिकेत तांदळे, सचिन सुर्वे, चेतन पालकर, ओमकार तारी आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे कार्यकर्ते सागर मढवी आणि नमिता मढवी यांनी दिवाळी सणानिमित्त उटणे वाटपाचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाला. या वेळी यतीन पाटील, मयूर कदम, सागर मढवी, नमिता मढवी आदी उपस्थित होते. दरम्यान, सागर मढवी यांना वाढदिवसानिमित्त अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या.**

# सीकेटी ज्युनिअर कॉलेजमध्ये विज्ञान प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात (१५ ऑक्टो) सायन्स विभागातर्फे शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारिणी सदस्य संजय भगत, अनिल खोपडे (सचिव महाराष्ट्र राज्य भारतीय जनता माथाडी ट्रान्सपोर्ट व सुरक्षा रक्षक जनरल कामगार युनियन) व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस टी गडदे यांच्या शुभहस्ते विज्ञान प्रदर्शनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. तसेच चांगू काना ठाकूर संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक



कैलास सत्रे,उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, इंग्रजी प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील तसेच विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांची उपस्थिती लाभली.

रामशेठ ठाकूर हायर सेकंडरी विद्यालय खारघर च्या रसायनशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका सविता शिरसाट (एम एससी केमिस्ट्री) व जीवशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका राणी कडुसकर(एम एससी बायोलॉजी) या परीक्षकांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रकल्पांचे परीक्षण केले.

जुनिअर कॉलेजच्या विज्ञान आणि वाणिज्य विभागातून ३७ गटातून १०८ विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनात भाग घेतला. विज्ञान प्रदर्शनात सहभागी सर्व विद्यार्थ्यांना विज्ञान व वाणिज्य विभागातील शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. रसायनशास्त्र विषयाच्या सहशिक्षिका स्मिता नाईक यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरशालेय ब्लाइंड कोडींग स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि.१४) सहशालेय समिती आणि आयटी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका स्तरावर ब्लाइंड कोडींग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



संस्थेचे कार्यकारिणी सदस्य स्वप्निल ठाकूर हे या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच संकुलातील मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, उच्च माध्यमिक विभागाचे प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, इंग्रजी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील आदी उपस्थित होते.

या स्पर्धेसाठी प्रवीण पवार (एमएससी कॉम्प्युटर सायन्स) व सागर व्यवहारे (एमएससी कॉम्प्युटर सायन्स यूजीसी नेट) यांनी परीक्षणाचे काम केले. या ब्लाइंड कोडींग स्पर्धेमध्ये आसपासच्या परिसरातील १५ उच्च माध्यमिक विद्यालयानी भाग घेतला तसेच ५० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवून आपले प्रोग्रामिंग ज्ञान आणि सर्जनशीलता प्रदर्शित केली.

आयटी विषयाच्या सहशिक्षिका शीतल पाटील यांनी स्पर्धेची नियमावली स्पष्ट केली. टीएन घरत जुनियर कॉलेज गव्हाण येथील आयटी विषयाच्या सहशिक्षिका स्वाती देशमुख यांनी स्पर्धेच्या नियोजनाचे कौतुक केले. ब्लाइंड कोडींग स्पर्धेत निशा संतोष गुप्ता (सीकेटी ज्युनिअर कॉलेज) या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक तर रुची प्रकाश अंकुशे हिने द्वितीय क्रमांक तर वेदांत विलास पाटील (सीकेटी जुनियर कॉलेज) याने तृतीय क्रमांक पटकावला. सर्व विजेत्यांचा मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर स्पर्धेत सहभागी मुहसीन मन्सूर हसन (रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज खारघर) व दिवेन भावीन शाह (आरटीपीएस जुनिअर कॉलेज खारघर) या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

प्रमुख पाहुणे स्वप्नील ठाकूर यांनी विद्यार्थ्यांचे कोडिंग कौशल्य वाढविण्यासाठी अशा स्पर्धा वारंवार आयोजित कराव्यात असा सल्लाही त्यांनी आयोजकांना दिला. कोडींग स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे कोडींग कौशल्य प्रदर्शित करण्यास, आपली समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करण्यास एक उत्कृष्ट व्यासपीठ मिळाले. कोडींग स्पर्धेचे आकर्षक सूत्रसंचालन विज्ञान विभागाच्या सहशिक्षिका अपर्णा मुकणे यांनी केले.

आयटी विषयाच्या सहशिक्षिका रोशनी परदेशी यांनी सहभागी विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रेरणादायी भाषणा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



**पनवेल : करंजाडे येथील वडघर ब्रिज ते दुधे विटेवारी बिल्डिंग पर्यंतच्या रस्त्यावरील खड्डे ग्रामपंचायतीच्या वतीने तातडीने बुजविण्यात आले आहेत. या डागडुजी कामादरम्यान सरपंच मंगेश शेलार, ग्रामपंचायत सदस्य आदी उपस्थित होते.**



**पनवेल : महापालिकेच्या मुख्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेस आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

## संपादकीय

# भरपाईबद्दल कठोर आदेश

रस्त्यांवरील खड्ड्यांसंदर्भात न्यायालयाने यापूर्वीही आदेश दिले व संबंधित यंत्रणांना खडसावलेही, परंतु त्यानंतरही परिस्थितीत काहीही बदल झाला नाही. त्यामुळे याखेपेला मुंबई उच्च न्यायालयाने अतिशय कठोर भूमिका घेत यासंदर्भात यंत्रणांना उत्तरदायी केले व भरपाईची कार्यपद्धती स्पष्ट करणारा आदेश दिला आहे.

**दरवर्षी पावसाळ्यात मुंबई व आसपासच्या अनेक शहरांमधील रस्त्यांची दुर्दशा होते. रस्त्यात खड्डे आहेत असे म्हणावे की खड्ड्यांमधून रस्ता शोधावा अशी परिस्थिती या शहरांतील अनेक भागांमध्ये दिसते. बहुदा मध्यमवर्गातील किंवा त्याहूनही खालच्या आर्थिक स्तरातील दुचाकीने प्रवास करणारे लोक या खड्ड्यांचे बळी ठरतात. अनेकांना पाठदुखी वगैरे व्याधी जडतात. त्याविषयी तर चर्चाही होत नाही. परंतु दरवर्षी खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातात जेव्हा जेव्हा कुणाच्या विशीतील होतकरू मुलाचा बळी जातो किंवा एखाद्या कुटुंबातील एकमेव कमावती व्यक्ती मरण पावते, तेव्हा वृत्तवाहिन्यांवरून त्यांच्या कुटुंबियांचा आक्रोश अवश्य पहायला मिळतो. अशा बातम्या अनेक वर्षे आपण पाहतो आहोत. वास्तवत: सुरक्षित आणि खड्डेमुक्त रस्ते हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे आणि अशी सुविधा पुरवणे ही सरकारी यंत्रणांची वैधानिक जबाबदारी आहे असे न्यायालयाने यापूर्वीच स्पष्ट केले होते. आता मात्र त्याचे स्मरण करून देत न्यायालयाने भरपाईचा सुस्पष्ट आदेश दिला आहे. खड्डे किंवा उघड्या मॅनहोलमुळे मृत्यू झाल्यास वारसांना सहा लाख तर जखमींना ५० हजार ते अडीच लाख रुपयांच्या भरपाईचा आदेश न्यायालयाने दिला आहे. काही वकिलांच्या पुढाकारामुळे न्यायालयाने 'सुओ मोटो' संबंधित याचिका पुनरूज्जीवित केली हे विशेष. यावेळी वकिलांनी मुंबई, ठाणे व भिवंडीमधील खड्डेमृत्यू व जखमींसंबंधीच्या घटना न्यायालयाच्या लक्षात आणून दिल्या. वास्तविक रस्त्यांची दुर्दशा दर पावसाळ्यात पुन्हा पुन्हा तशीच झालेली का दिसते हे एक उघड गुपित आहे. आपल्याकडे उत्तम प्रशिक्षित अभियंते आहेत. रस्तेदुरुस्तीसाठी मोठा निधी खर्च केला जाताना दिसतो. असे असूनही दरवर्षी पावसाळ्यात रस्त्यांची चाळण झालेली दिसून येते. या परिस्थितीमागे भ्रष्टाचार हे कारण आहे याचीही चर्चा अनेक वर्षे होत आली आहे, पण सगळ्यांना सारे काही ठाऊक असूनही आजवर या परिस्थितीत ठोस बदल करण्याचा प्रयत्न झालेला दिसला नव्हता. आता मात्र न्यायालयाने महापालिका, नगरपालिका व त्यांच्या हद्दीपलीकडे नेमके कोणते अधिकारी भरपाईसंबंधी समितीत असतील हे स्पष्ट केले आहे. या समित्यांना न्यायालयाने कार्यपद्धतीही निश्चित करून दिली आहे. राज्यभरातील सर्व महापालिका, पालिका व रस्त्यांशी संबंधित सर्व सरकारी यंत्रणांना हा आदेश लागू असणार आहे. नुकसानभरपाईचा दावा आल्यानंतर सहा ते आठ आठवड्यांत भरपाईची रक्कम दिली गेली पाहिजे हेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. अन्यथा संबंधित महापालिकेचे आयुक्त, नगरपालिकेचे सीईओ, जिल्हाधिकारी किंवा प्रधान सचिव हे त्या-त्या प्रशासनाप्रमाणे जबाबदार असतील. भरपाईची रक्कम देण्यास विलंब झाल्यास ती दिली जाईपर्यंत नऊ टक्के वार्षिक व्याज लागू होईल असेही खंडपीठाने आदेशात स्पष्ट केले आहे. सरकारी आकडेवारीनुसार २०२३मध्ये राज्यात रस्ते अपघातांत १५ हजारांहून अधिक लोकांचा बळी गेला. यापैकी अंदाजे दहा टक्के अपघात हे रस्त्यांच्या वाईट स्थितीमुळे घडले असावेत. आता न्यायालयाने या संदर्भात इतकी कठोर भूमिका घेतल्यामुळे तरी रस्त्यांच्या स्थितीत काही बदल घडेल अशी आशा करूया.**

# मध्यस्थी : वाद मिटविण्याचा सौहार्दपूर्ण मार्ग

वाद हे मानवी समाजातील अपरिहार्य वास्तव आहे, पण त्याचे समाधान सौहार्दपूर्ण पद्धतीने करणे ही खरी प्रगती आहे. हाच विचार लक्षात घेऊन भारत सरकारने मध्यस्थता कायदा १९२३ लागू केला. या कायद्याचा उद्देश म्हणजे मध्यस्थीद्वारे वाद सोडवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करणे, मध्यस्थी करारांची अंमलबजावणी सुनिश्चित करणे, मध्यस्थांची नोंदणीसाठी संस्था उभी करणे तसेच सामुदायिक आणि ऑनलाईन मध्यस्थीला प्रोत्साहन देणे हा आहे.



### मध्यस्थीची पार्श्वभूमी आणि कायदेशीर आधार

मध्यस्थीची कल्पना नवीन नसून लवाद आणि सामंजस्य कायदा १९९६ तसेच कायदेशीर सेवा प्राधिकरण कायदा १९८७ या कायद्यांनी या प्रक्रियेला मजबूत कायदेशीर पाया दिला. विशेषतः लोक अदालतची स्थापना ही न्यायालयीन व्यवस्थेबाहेर समझोत्याने वाद सोडवण्याच्या संकल्पनेला चालना देणारी ठरली. न्यायालयांतील वाढती खटले व त्यासाठी लागणारा वेळ लक्षात घेता वैकल्पिक वाद निराकरणही संकल्पना उदयास आली.

### वैकल्पिक वाद निराकरणाची संकल्पना

ADR म्हणजे पारंपरिक न्यायालयीन प्रक्रियेऐवजी जलद, सोपी आणि कमी खर्चिक उपाय देणारी प्रणाली. यात लवाद, सामंजस्य आणि मध्यस्थी या पद्धतींचा समावेश होतो. मध्यस्थी ही त्यातील सर्वाधिक लोकप्रिय आणि प्रभावी पद्धत मानली जाते.

### मध्यस्थी म्हणजे काय?

मध्यस्थी ही एक स्वेच्छेची, गोपनीय आणि लवचिक प्रक्रिया आहे, ज्यात निष्पक्ष तृतीय पक्ष म्हणजे मध्यस्थ दोन्ही पक्षांना संवाद आणि समजुतीच्या माध्यमातून समाधानकारक तोडगा काढण्यास मदत करतो. न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा ही अधिक वेगवान, कमी खर्चिक आणि संबंध जपणारी असते.

### मध्यस्थीचे फायदे

न्यायालयीन खटल्यांच्या तुलनेत वाद लवकर निकाली निघतात, खर्च कमी आणि प्रक्रिया सोपी असते. वादग्रस्त पक्षांची गोपनीयता राखली जाते तसेच निकालावर दोन्ही पक्षांचा प्रत्यक्ष सहभाग आणि नियंत्रण असते. वैयक्तिक, व्यावसायिक आणि सामाजिक नाती टिकवण्यासाठी मध्यस्थी उपयुक्त ठरते. प्रत्येक नागरिकाला वाद सोडवण्याचा सुलभ मार्ग उपलब्ध होतो, न्यायालयांवरील ताण कमी होतो आणि न्यायालयीन निकालांपेक्षा अधिक सर्जनशील उपाय सापडतात.



### मध्यस्थीसाठी योग्य वादप्रकार

मध्यस्थीचा उपयोग कौटुंबिक वाद (घटस्फोट, मुलांची देखरेख, वारसा), व्यावसायिक वाद (करार, व्यवहार, भागीदारीतील मतभेद), शेजारी वाद (मालमत्ता, आवाजासंबंधी तक्रारी), कामगार वाद (कर्मचारी-नियोक्ता मतभेद) आणि ग्राहक तक्रारी (वस्तू किंवा सेवांशी संबंधित वाद) अशा विविध क्षेत्रांत केला जातो.

### मध्यस्थीची प्रक्रिया

मध्यस्थ प्रथम प्रक्रिया समजावतो, नंतर दोन्ही पक्ष आपली मते मांडतात. त्यानंतर एकत्र किंवा स्वतंत्रपणे मध्यस्थाशी चर्चा होते. मध्यस्थ परस्पर समजुतीने हिताचा विचार करून तोडगा सुचवतो आणि शेवटी दोन्ही पक्षांच्या सहमतीने लेखी करारावर स्वाक्षऱ्या घेतल्या जातात.

### मध्यस्थाची भूमिका

मध्यस्थ निष्पक्ष, तटस्थ आणि संवाद सुलभ करणारा असतो. तो प्रशिक्षित व्यावसायिक म्हणून वाद व्यवस्थापन आणि संवाद कौशल्याचा वापर करतो. त्याचा उद्देश कोणत्याही पक्षाचा पक्षपात न करता दोन्ही पक्षांना तोडग्याच्या दिशेने नेणे हा असतो.

### मध्यस्थी : शांततामय समाजाची पायाभरणी

भारतामध्ये मध्यस्थीबाबत जागरूकता झपाट्याने वाढत आहे. राष्ट्रीय लोक अदालतींमधून हजारो प्रकरणे मैत्रीपूर्ण पद्धतीने सोडवली गेली आहेत. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे जनतेला मोफत कायदेशीर मदत पुरवून मध्यस्थीला प्रोत्साहन देतात. त्यामुळे सर्वांसाठी न्याय ही संकल्पना प्रत्यक्षात उतरते आणि समाजात सौहार्द वृद्धिंगत होते.

### पुण्यातील यशस्वी मध्यस्थी उपक्रम

पुण्यात मध्यस्थीद्वारे वाद सौहार्दपूर्ण पद्धतीने सोडवण्याच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे. नुकत्याच पार पडलेल्या 'मेडिएशन फॉर द नेशन ड्राइव्ह' या उपक्रमात तब्बल १,९२२ प्रकरणे मध्यस्थीद्वारे समाधानकारक रित्या निकाली निघाली. या मोहिमेमुळे वैकल्पिक वाद निराकरण यंत्रणांचे वाढते महत्त्व अधोरेखित झाले आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण महेंद्र के. महाजन म्हणतात, मध्यस्थी ही संघर्षांना सकारात्मक पद्धतीने सोडवण्याची दिशा देते. ती नातेसंबंध जपत समाजात सौहार्द वाढवते. पुण्यात मध्यस्थीला अधिक बळकटी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

सदस्य सचिव सोनल पाटील म्हणतात, मध्यस्थीद्वारे आम्ही पक्षकारांना परस्परसंमतीने समाधानकारक तोडगे शोधण्यासाठी सक्षम करतो. ही सर्वांपर्यंत न्याय पोहचवण्याची आणि समाजात समेट व ऐक्य प्रस्थापित करण्याची प्रक्रिया आहे.

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या या यशस्वी उपक्रमामुळे मध्यस्थीला नवा वेग मिळाला आहे. मध्यस्थी ही केवळ वाद सोडवण्याची पद्धत नाही, तर ती संवाद, समजूत आणि सौहार्द यांचा सेतू आहे. या प्रयत्नांनी समाजात शांततेचा आणि न्यायाचा संदेश दिला आहे.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**



## बदलते तंत्रज्ञान

# भारतातील एआय हबमध्ये गुगल करणार गुंतवणूक

भारतीयसांठी एक आनंदाची बातमी आहे. गुगल येणाऱ्या पाच वर्षात १५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी मंगळवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या वेळी त्यांनी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे पहिल्या एआय हबसाठी अमेरिकन टेक जायंटच्या योजनांबाबत माहिती दिली.



गुगलने विशाखापट्टणममध्ये एक भव्य डेटा सेंटर आणि आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) बेसची घोषणादेखील केली. हे सेंटर अमेरिकेबाहेरचे त्यांचे सर्वात मोठे एआय हब असेल आणि पुढील पाच वर्षांत ते भारतात १५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

भारतीय वंशाच्या सीईओने पिचाई यांनी या हालचालीला ऐतिहासिक म्हटले आहे. हे हब गिगावॅट-स्केल संगणकीय क्षमता, एक नवीन आंतरराष्ट्रीय समुद्राखालील प्रवेशद्वार आणि मोठ्या प्रमाणात ऊर्जा पायाभूत सुविधा एकत्र आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, याबाबत सुंदर पिचाई यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. आम्ही भारतातील उद्योग आणि वापरकर्त्यांपर्यंत आमचे उद्योग-अग्रणी तंत्रज्ञान पोहोचवू, एआय नवोपक्रमाला गती देऊ आणि देशभरात वाढ करू,असे या पोस्टमध्ये पिचाई यांनी म्हटले आहे.

गुगलने एआय डेटा सेंटर कॅम्पससाठी अदानी ग्रुपसोबत भागीदारी केली आहे. ही देशातील गुगलची आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक आहे.

याबाबत कंपनीने एक अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले आहे. यामध्ये हे भारत सरकारच्या 'डेव्हलप इंडिया २०४७' व्हिजनशी सुसंगत आहे, जे एआय-संचालित सेवांच्या विस्ताराला गती देईल. या उपक्रमामुळे भारत आणि अमेरिका दोघांसाठीही प्रचंड आर्थिक आणि सामाजिक संधी निर्माण होतील आणि एआय क्षमतांमध्ये पिढीजात बदल होण्याचा मार्ग मोकळा होईल, असे या निवेदनात म्हटले आहे.

माहितीनुसार, मायक्रोसॉफ्ट आणि अमेझॉन सारख्या प्रतिस्पर्धी कंपन्यांनी भारतात डेटा सेंटर प्रकल्पांसाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली आहे, ज्यामुळे देशातील जवळजवळ एक अब्ज इंटरनेट वापरकर्त्यांना क्लाउड आणि एआय-चालित सेवांसाठी एक महत्त्वाची बाजारपेठ म्हणून प्रकाशझोतात आली आहे.

# नाटककार गोविंद पुरुषोत्तम देशपांडे

गो.पु. देशपांडे अर्थात गोविंद पुरुषोत्तम देशपांडे हे एक मराठी नाटककार, कवी आणि निबंधलेखक होते. त्यांचा जन्म रहिमतपूर येथे २ ऑगस्ट १९३८ रोजी झाला. आज त्यांचा स्मृतीदिन (१६ ऑक्टोबर २०१३) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



## निमित्त

सातारा जिल्ह्यातील रहितमतपूर हे त्यांचे गाव. त्यांना शाळेत घातल्यावर देशपांडे यांनी दीड वर्षातच पहिली ते तिसरी हा अभ्यास पुरा केला होता. रहिमतपूरहून ते १९५४मध्ये मॅट्रिक झाले, आणि पुढील शिक्षणासाठी बडोद्याला आणि नंतर दिल्लीला गेले. तेथे जवाहर नेहरू विद्यापीठातून त्यांनी चीन हा विषय घेऊन पीएच.डी.केली. हाच विषय घेऊन त्यांनी हाँगकाँग येथून एक पदविका मिळवली. त्यांचा मराठी संतकवींसकट इतर कवींच्या साहित्याचा चांगला अभ्यास होता. ते दिल्ली विश्वविद्यालयातून राज्यशास्त्राचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाल्यावर ते पुण्यात स्थायिक झाले होते. ते चिनी भाषा-तज्ज्ञ होते आणि भारत-चीन राजकीय संबंधाचे जाणकार होते.

जर्नल ऑफ आर्ट्‌स न्ड आयडियाज ह्या नियतकालिकाचे ते संस्थापक संपादक होते. शिक्षण बोर्डाचे आणि 'चायना रिपोर्ट'चे ते सभासद होते. गो.पु. देशपांडे यांचे आजोबा आणि आई-वडील ही सर्व मंडळी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात उतरलेली. वडील डॉक्टर होते आणि त्यांचा रहिमतपुरात दवाखाना होता. गो.पुंचा धाकटा भाऊ दिलीप आणि त्याच्याहून धाकटी बहीण ज्योती सुभाष. ज्योती सुभाष आणि त्यांची कन्या अमृता सुभाष या दोघीही लेखिका आणि अभिनेत्री आहेत. गो.पु. देशपांडे यांची कन्या प्रा.डॉ. अश्विनी देशपांडे या दिल्लीत अर्थशास्त्राच्या प्राध्यापक आहेत. गोपुंच्या चिरंजीवांचे नाव सुधन्वा आहे.

गो.पु. देशपांडे यांनी इंग्रजी-मराठीत वैचारिक, रंगभूमीविषयक, राजकीय आणि साहित्यविषयक लेखन भरपूर केले. प्रायोगिक नाट्यलेखनाच्या प्रवाहात गो. पु. देशपांडे यांनी विचारनाट्याची धारा पहिल्यांदा निर्माण करण्याचा यत्न केला. राजकीय जाणिवा ही या लेखनामागची प्रेरणा आहे. गो.पु. देशपांडे हे अनेक राजकीय चळवळींचे साक्षीदार होते; पूर्वी काहीसे संबंधितही होते. जाणतेपणाने त्यांनी राजकीय चळवळींचा अभ्यास केला होता, त्यामुळे त्यांच्या नाटकातील विचारांना आणि आशयाला एक प्रकारची विश्वासार्हता होती.

### गो.पु. देशपांडे यांनी लिहिलेली मराठी नाटके आणि इतर वाङ्मय


अंधारयात्रा (नाटक), अस्सा नवरा सुरेख बाई (नाटक), इत्यादी इत्यादी कविता (कवितासंग्रह), उध्वस्त धर्मशाळा (नाटक), एक वाजून गेला आहे (नाटक), चर्चक निबंध (भाग १, २) (निबंधसंग्रह), चाणक्य विष्णूगुप्त (नाटक), द वर्ल्ड ऑफ आयडियाज इन मॉडर्न मराठी (इंग्रजी पुस्तक), मामकाः पाण्डवाश्चैव (नाटक), रस्ते (नाटक), रहिमतपुरकरांची निबंधमाला भाग १, २ –नाटकी निबंध (लेखसंग्रह), शेवटचा दिस (नाटक. हिंदीतसुद्धा रूपांतरित), सत्यशोधक (नाटक; हिंदीतसुद्धा रूपांतरित)

### गो.पु. देशपांडे यांना मिळालेले पुरस्कार

जयवंत दळवी पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवनगौरव पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासनाचा अनंत काणेकर पुरस्कार, संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९९६), रूपवेध प्रतिष्ठानचा तन्वीर सन्मान (मरणोत्तर, २०१३)

**(साभार : विकीपीडिया)**

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

# शिळे अन्न सतत गरम करून खाण्याचे परिणाम

भारतात अन्न हे पूर्णब्रम्ह मानले जाते. त्यामुळे अन्नाची नासाडी करु नये, अन्न वाया जाऊ देऊ नये असे नियम घरोघरी असतात. उरलेले शिळे अन्नही आपण आवडीने पुन्हा खातो. मात्र काही वेळा अन्न संपवण्याच्या नादात आपण आरोग्याची काळजी घ्यायला विसरतो.



शिळे खाऊ नये हे तर आपल्याला माहिती आहे. रात्रीची उरलेली भाजी दुसऱ्या दिवशी आणि अगदी पुढचे तीन दिवसही आपण खातो. ती संपेपर्यंत गरम करुन खातात. फ्रिजमध्ये ठेवली की खराब होत नाही, पण असे करणे खरंच योग्य आहे का?

शिळे अन्न पुन्हा गरम केल्याने त्यातील पोषक घटकांचे प्रमाण कमी होते. विशेषतः जीवनसत्त्व ए, बी आणि सी सारखी विरघळणारी सत्वे गरम केल्यावर नष्ट होतात. त्यामुळे त्या अन्नातून शरीराला अपेक्षित पोषण मिळत नाही. वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले तर, ६० अंश सेल्सियसपेक्षा जास्त तापमानावर अनेक सूक्ष्मजीव मरतात, पण काही उष्णतेस प्रतिरोधक बॅक्टेरिया गरम केल्यावरही टिकतात. जर अन्न योग्य प्रकारे थंड आणि गरम केले गेले नाही, तर हे बॅक्टेरिया पुन्हा वाढू शकतात आणि फूड पॉयझनिंगचा धोका वाढतो.

उरलेली भाजी फ्रिजमध्ये ठेवली तरी ती पूर्ण थंड झाल्यानंतरच ठेवावी. गरम भाजी थेट फ्रिजमध्ये ठेवल्यास ओलावा तयार होतो आणि त्यामुळे coli, Salmonella सारखे बॅक्टेरिया वाढू शकतात. विशेषतः पालेभाज्या, फुलकोबी, बटाटे आणि भात यांसारखे पदार्थ पुन्हा गरम करु नयेत, कारण त्यात नायट्रेट्स आणि ॲक्रिलामाइड्स नावाचे घटक तयार होतात. हे घटक शरीरात दीर्घकाळ राहिल्यास पचनसंस्था आणि यकृतावर वाईट परिणाम करू शकतात.

याचबरोबर वारंवार गरम केल्याने तेलात ऑक्सिडेशन होते, ज्यामुळे ट्रान्स फॅट्स निर्माण होतात. हे फॅट्स हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल वाढवण्यास कारणीभूत ठरु शकतात. त्यामुळे वारंवार गरम केलेली भाजी शरीरासाठी हानिकारक ठरते. शिळे अन्न वाया जाऊ नये ही गोष्ट अगदी बरोबर असली तरी त्यालाही मर्यादा आहेत. एखादा पदार्थ जास्त दिवस तसाच असेल तर तो खाऊ नये. ताजे, गरमागरम असेच पदार्थ खावेत.

# दोन खात्यांमधील असमन्वयामुळे वयाळ-लोधिवली रस्ता रखडला

## योग्य मार्ग काढून काम पूर्ण करण्याचे आमदार महेश बालदी यांचे निर्देश



**चौक : प्रतिनिधी**

आमदार महेश बालदी यांनी खालापूर तालुक्यातील वयाळ-लोधिवली रस्त्याला दिलेला कोट्यवधी रुपयांचा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या असमन्वयामुळे पडून आहे. या रस्त्याची अवस्था बिकट आहे.

आमदार महेश बालदी यांनी वयाळ ते लोधिवली या रस्त्यासाठी निधी मंजूर करून दिला असताना दोन विभागांच्या लढाईत ग्रामस्थ पिचलेल्या अवस्थेत आहेत. आमदार महेश बालदी यांनी संबंधित विभागांना योग्य सूचना दिल्या असून योग्य मार्ग काढून काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.

वयाळ ते लोधिवली रस्ता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या पाईपलाईनमुळे खराब होताना दिसत आहे, तर हा रस्ताच आमच्या मालकीचा असल्याचा दावा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी केला आहे. दोन-तीन वर्ष पाईपलाईनचे काम सुरू आहे. रस्त्याची अवस्था पूर्णपणे असुरक्षित व खराब झाली आहे. याच मार्गावर शाळा आहेत. पावसाळ्यात याची अवस्था बिकट झाली होती. विद्यार्थी यांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याने भारतीय जनता पक्षाचे नेते प्रीतम म्हात्रे यांनी स्वखर्चाने रस्ता दुरुस्त केला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी अरेरावी करतात, असा आरोप केला जात आहे. खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, पोलीस निरीक्षक सचिन पवार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना निवेदने देण्यात आली. आमदार महेश बालदी यांना प्रत्यक्ष भेटून हा गुंता सोडवण्याची विनंती करण्यात येणार आहे.


उपसरपंच रोशन गायकवाड, प्रमोद पवार, अनिल पवार, अर्जुन पवार, समीर म्हात्रे, रूपेश पवार, अक्षय म्हात्रे, देवा पवार, नितीन ठाकूर, भूषण म्हात्रे, जयेश ठाकूर, सुरेश देशमुख, दिगंबर मापाडी, प्रदीप गायकवाड, राहुल गायकवाड, मारुती पवार, सागर म्हात्रे, प्रमोद म्हात्रे, नारायण पवार, प्रसाद पवार, समीर पवार, जय पवार, संतोष पाटील, अमर ठाकूर, भरत म्हात्रे, अनंता म्हात्रे, रोहित ठाकूर व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

# अमृत संस्थेतर्फे विश्वविक्रमी दुर्गोत्सवाचा संकल्प

**अलिबाग : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांच्या वारशाचा जागतिक स्तरावर गौरव करण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेने या दीपावलीत विश्वविक्रमी दुर्गोत्सव साजरा करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत राज्यातील नागरिकांनी घराघरात गडदुर्गांच्या प्रतिकृती साकारून त्यासोबतचा सेल्फी संस्थेच्या संकेतस्थळावर अपलोड करून छत्रपतींना अनोखी मानवंदना द्यावी, असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

हिंदवी स्वराज्याच्या रक्षणासाठी छत्रपतींनी बांधलेल्या गडकिल्ल्यांपैकी १२ दुर्गांना युनेस्कोने अलीकडेच जागतिक वारसास्थळाचा दर्जा दिला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या सहयोगाने अमृतने 'दुर्गोत्सव' हा उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे. दरवर्षी दिवाळीच्या काळात बालमंडळी व तरुणाई घराघरात दुर्गांच्या प्रतिकृती तयार करतात. हीच



परंपरा या उपक्रमातून जागतिक स्तरावर पोहचविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या दुर्गोत्सवात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी रायगड, राजगड, प्रतापगड, सिंहगड, खान्देरीचा दुर्ग, साळेरदुर्ग, जिंजीचा किल्ला, पन्हाळगड, शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड किंवा पद्मदुर्ग (सुवर्णदुर्ग) यांपैकी कोणताही गड निवडून त्याची प्रतिकृती साकारायची आहे. नंतर त्या प्रतिकृतीसोबतचा सेल्फी www.durgotsav.com या संकेतस्थळावर अपलोड करायचा आहे.

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र पाठवले जाणार असून, अमृतच्या 'अमृत विद्यया' या डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मवर छत्रपतींच्या गौरवशाली इतिहासावर आधारित ९९९ रुपये किमतीचे प्रशिक्षण पूर्णपणे विनामूल्य देण्यात येईल. या अभ्यासक्रमात स्वराज्य रक्षक दुर्ग, कविभूषणांची काव्ये, शिवरायांच्या पराक्रमांचा आलेख आणि स्वराज्यासाठी लढलेल्या वीर योद्ध्यांचा परिचय यांचा समावेश आहे.


**कामगार पाहिजेत**

पनवेलमधील मालवणी हॉटेल साठी 12th pass सुपरवायझर/कॅशिअर व वेटर पाहिजे आहे, पगारा व्यतिरिक्त राहण्याची व जेवणाची सोय आहे.

**संपर्क:८१०४४५३१६४/ ९८६०७७८१५३/ ८२९१७३४९३३**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे **शिलार**, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत, या मिळकतींचे मालक श्रीकांत प्रभाकर पाटील, यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक / भुमापन क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ३७/२ | ००-८७-०० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी **श्रीकांत पाटील** यांचे मालकीचे ००-२७-०० हे.आर.पॉ. | ०-०५ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १६/१०/२०२५.**

**सही/-**
**ॲड. स्वप्नील सदानंद पाटील**
बी. ए.एल.एल.बी.
पत्ता - भालिवडी, पो. गौळवाडी ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ८७७९९३३८७२

# सिद्धांत संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

सिद्धांत सेवा संस्थेच्या वतीने खोपोली नगर परिषद शाळा मुळगाव-ठाकूरवाडी या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना नवीन साऊंड सिस्टम व विविध शालेय साहित्यांचे वाटप करून जागतिक शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

सिद्धांत सेवा संस्थेच्या विविध उपक्रमातील हा शैक्षणिक उपक्रम राबवताना शाळेतील गरजू, होतकरू, आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. लोणावळा येथील हॉटेल व्यवसायिक राज पाटील यांच्या माध्यमातून शाळेला आधुनिक साऊंड सिस्टिम भेट देण्यात आली. तसेच हॉटेल व्यवसायिक यश राज पाटील व एस व्ही ग्रुपचे राजेश शहा यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना लोणावळा चिक्की व खाऊचे वाटप करण्यात आले.

या वेळी खोपोली नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे व मोहन अवसरमल तसेच माजी नगरसेवक किशोर पानसरे, राजू डुमने, संजय पाटील, रायगड प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष प्रशांत गोपाळे व सिद्धांत सेवा संस्थेचे संस्थापक व पत्रकार जगन्नाथ (भाई) ओव्हाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष सिद्धांतचे विजय कोळी हे होते.

सिद्धांत सेवा संस्थेचे उपाध्यक्ष शशिकांत गोरड यांनी आपल्या संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेताना एस. टी. कर्मचाऱ्यांचा सहभाग असलेली ही संस्था गेली पंधरा वर्षे सातत्याने असे शैक्षणिक उपक्रम राबवताना आदिवासी भागात आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर तसेच वृक्षारोपण असे विविध उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. अध्यक्ष विजय कोळी यांनी सामाजिक कार्यात काम करत असताना योग्य लोकांपर्यंत मदत पोहचवणे हे संस्थेचे उद्दिष्ट असून यापुढेदेखील संस्थेच्या वतीने योग्य ती मदत केली जाईल असे आश्वासित केले.

या कार्यक्रमाला स्थानिक मान्यवर प्रतिनिधींसह सिद्धांत सेवा संस्थेचे पदाधिकारी गजानन गायकवाड, अरुण दुष्मीकर, विनायक यादव, दिनेश कदम, राहुल जाधव, विशाल वाघमारे, शैलेश मेस्त्री, अशोक ठाकूर, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष म्हस्के यांनी केले तर आभार शाळेचे मुख्याध्यापक संतोष धानिवले यांनी मानले.



# तळाशेत पोस्ट ऑफिसचे नवीन जागेत स्थलांतर

**माणगाव : बातमीदार**

तळाशेत पोस्ट ऑफीस १४ ऑक्टोबर रोजी नवीन जागेत स्थलांतर झाले आहे. नवीन पत्ता - जय विला अपार्टमेंट, गाळा नंबर ९, तळाशेत इंदापूर येथे असा आहे.

ऑफिसचे उद्घाटन रायगड डिव्हिजनचे डाक अधीक्षक सुनील थळकर यांच्या हस्ते करण्यात आले, सोबत माणगाव सब डिव्हिजन डाक निरीक्षक संतोष मोरे तसेच सिस्टिम डमिन ज्ञानेश राजे हे उपस्थित होते.

ऑफिसचे उद्घाटन यशस्वी करण्यासाठी तळाशेत पोस्ट ऑफिसचे पोस्ट मास्टर सुबोध कासारे व सर्व कर्मचारी यांनी योगदान दिले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मौजे मोहो, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांची नावे |
|---|---|---|---|
| १२४/७ | ०-१३-०० | २.३१ | गणेश भगवान पाटील<br>उमेश भगवान पाटील<br>भुपेश भगवान पाटील |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १५/१०/२०२५.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय: २, आशादिप अपार्टमेंट
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला,
पनवेल ता. पनवेल, जि. रायगड
मो. क्र.: ९९३०३६९८६१

# तरुणीची आत्महत्या

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील खारमजगाव येथील एका तरुणीने राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. याप्रकरणी मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

फिर्यादी नथुराम वाडकर यांची मुलगी (वय १७) ही महाविद्यालयात शिकत होती. त्याच गावातील रहिवासी हेमंत ऊर्फ हर्षद हरिश्चंद्र कांबळे (वय ३२) हा विवाहीत असताना मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असतानादेखील तिच्याशी वारंवार फोनवर बोलुन तिचा मोबाईल व्दावारे पाठलाग करून कॉलवर बोलली नाहीत, तर तुझ्या कॉलेजमध्ये मित्र मैत्रीनीनां आपल्या दोघांच्या संबंधाबद्दल सांगुन अशी तुझी बदनामी करेन, तुला जगू देणार नाही अशी धमकी दिली. यास प्रेम संबंध नसतानादेखील गावात त्यांचे प्रेम संबंध असल्याबाबत तिची बदनामी करू असे वारंवार सांगत असल्याने तिचे जगणे असहय झाल्याने तीने राहत्या घराच्या गॅलरीमध्ये लोखंडी पाईपला नॉयलॉनच्या रस्सीने आपले जीवन संपविले.

मुलीला आत्महत्या करण्यास प्रवृत्तकेल्यामुळे हेमंत ऊर्फ हर्षद हरिश्चंद्र कांबळे (वय ३२) यांच्याविरोधात मुरूड पोलीस ठाण्यात गु.रजि. नं. ९०/२०२५ २०२३ कलम बी.एन.एस. १०८ ७८(२), ३५१ (२) प्रमाणे. सह बालकाचे बालकाचे अपराधा पासुन सह लैगिक संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ११ (४) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## रोहा अष्टमी नगर परिषद

**ता. रोहा, जि. रायगड पिन कोड- ४०२१०९.**
**फोन : कार्यालय-०२१९४-२३५७३७**
email : rohanagarpalika@gmail.com

**क्र.रोनप/आरोग्य/ ११५१/२०२५-२०२६** **दिनांक :- १५/१०/२०२५**

### जाहीर आवाहन

**अवैध फटका साठवणूक व विक्री तसेच प्रतिबंधित फटाके विक्रीबाबत**

स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत शहरामध्ये विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जात आहेत. या अभियानांतर्गत शहरामध्ये फटाकेमुक्त, प्लास्टिकमुक्त, कचरामुक्त व पर्यावरणपूरक हरित सण व उत्सव साजरे करावयाचे आहेत. त्याअनुषंगाने सर्व फटाके विक्रेत्यांना सुचित करण्यात येते की,

१. शासन निर्णय परिपत्रक क्रमांक संकीर्ण १०२० सी-१८६/पोल-९ दिनांक ०६ नोव्हेंबर २०२० नुसार प्रतिबंधित केलेल्या फटाक्यांची विक्री आपणास करता येणार नाही.
२. शासन निर्णय क्र. याचिका-२०१६/प्र.क्र. ४३२/नवि-२० दिनांक ०५ नोव्हेंबर २०१६ चे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी फटाके विक्रेत्यांची राहील, याची नोंद घ्यावी.
३. भारत सरकार, अधिसूचना क्रमांक G.S.R.६८२ (E), dt ५.१०.१९९९ अन्वये १२५ dB (A१) पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती, विक्री किंवा वापर करण्यास मनाई केली आहे.
४. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉल्ट, लिथियम, अर्सेनिक, लीड, मक्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे.

**सण, समारंभ व उत्सव साजरा करताना खालील सूचनांचे पालन करावे :**

- सण व उत्सवांमध्ये (दीपावली, महापुरुष जयंती, गणेशोत्सव, मिरवणूक, यात्रा, इतर समारंभ) वापरण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण तसेच हानिकारक वायू निघाल्याने वायू प्रदूषण होते हे पर्यावरणास व मानवी आरोग्यास हानीकारक आहे. त्यामुळे फटाकेमुक्त व प्रदूषणमुक्त सण व उत्सव साजरे करावे.
- सण व उत्सवांमध्ये प्लास्टिकचा वापर टाळून कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा.
- सण व उत्सवांमध्ये सुशोभिकरण करण्याकरिता प्लास्टिक विरहीत वस्तूंचा बापर करावा व जास्तीत जास्त झाडे लावून पर्यावरणपूरक सण साजरा करण्यावर भर द्यावा.
- घरामध्ये तयार होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे घरगुती कंपोस्ट खत तयार करण्यावर भर देऊन त्या खताचा उपयोग आपल्या घराभोवतीच्या परसबागेत करावा.

शहरामध्ये प्रदूषण होणार नाही यासाठी प्रदूषणमुक्त, फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक सण व उत्सव (दीपावली, जयंती, गणेशोत्सव, मिरवणूक, यात्रा, इतर समारंभ) साजरा करावा व माझी वसुंधरा अभियान व स्वच्छ सर्वेक्षण अभियानामध्ये सहभागी होऊन नगर परिषदेस सहकार्य करावे. तरी येणारी दिवाळी हरित व पर्यावरणपूरक दिवाळी म्हणून साजरी करुया, तसेच आगामी येणारे सण व उत्सव (दीपावली, महापुरुष जयंती, गणेशोत्सव, मिरवणूक, यात्रा, इतर समारंभ) आनंदी व सुरक्षित राहो अशा सर्वांना हार्दिक शुभेच्छा

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

---

दैनिक रामप्रहर वृत्तपत्रामध्ये बुधवार दिनांक १५/१०/२०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती आज त्या पुढील मजकूर प्रसिद्ध करण्यात येत आहे. रेल्वे मंत्रालय मध्यरेल्वे आधिसूचना मुंबई २४ सप्टेंबर २०२५ रेल्वे (सुधारित) अधिनियम २००८ चे कलम २० अ अन्वये

काही तांत्रिक अडचणीमुळे पान क्र. १२ वर शेवटचे नाव नथूराम गणपत कातकरी पर्यंत प्रसिध्द झाले आज या पुढे ती जाहिरात अशी वाचावी.

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | 7/12 नुसार भूधारकाचे नाव | सर्व्हे नं. | 7/12 नुसार एकूण क्षेत्र (हे.आर) | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मयुरी मिलिंद ओक | 102/2 | 0.0660 | |
| | | | संपदा सुरेश ढोसर | | | |
| | | | निलेश सुरेश ढोसर | | | |
| | | | भारत सरकार वतीने महाराष्ट्र सरकार | | | |
| | | | अर्जुन गुण्या कातकरी | 102/3 | 0.1160 | |
| | | | सुनिता बाळू कातकरी | | | |
| | | | सुमन किसन कातकरी | | | |
| | | | कुंदा सिताराम कातकरी | | | |
| | | | कैलास चंदर वाघमारे | | | |
| | | | गोदी बाळ्या कातकरी | | | |
| | | | छबिबाई बाळू कातकरी | | | |
| | | | दादु पांडु कातकरी | | | |
| | | | पांडु बाळू कातकरी | | | |
| | | | बबल्या चंदर वाघमारे | | | |
| | | | मंदा शंकर मुकणे | | | |
| | | | रखमी चंदर वाघमारे | | | |
| | | | राम किसन कातकरी | | | |
| | | | रामदास शंकर पवार | | | |
| | | | सखाराम शंकर पवार | | | |
| | | | अरुणकुमार मथुरदास ठक्कर | 107/1 | 0.5650 | 0.1377 |
| | | | भारत सरकार वतीने महाराष्ट्र सरकार | | | |
| | | | कुंदा सिताराम कातकरी | 107/2 | 0.7000 | |
| | | | कैलास चंदर वाघमारे | | | |
| | | | गोदी बाळ्या कातकरी | | | |
| | | | छबिबाई बाळू कातकरी | | | |
| | | | दादु पांडु कातकरी | | | |
| | | | बबल्या चंदर वाघमारे | | | |
| | | | मंदा शंकर मुकणे | | | |
| | | | रखमी चंदर वाघमारे | | | |
| | | | राम किसन कातकरी | | | |
| | | | रामदास शंकर पवार | | | |
| | | | सखाराम शंकर पवार | | | |
| | | | सुनिता बाळू कातकरी | | | |
| | | | सुमन किसन कातकरी | | | |
| | | | पांडु बाळू कातकरी | | | |
| | | | अर्जुन गुण्या कातकरी | | | |
| | | | | | एकूण आवश्यक क्षेत्र | 0.9959 |
| | | | | | एकूण आवश्यक क्षेत्र (9 गावे) | 13.0019 |

[फा.सं.G197/Panvel-chouk/Panvel Chord/20A]

विमाका/ कोवि/२०२५-२०२६/१३५

**अवनीश कुमार पाण्डेय, मुख्य प्रशासकिय अधिकारी (निर्माण)**

# बेशिस्त पार्किंगप्रकरणी वाहनांवर कारवाई





**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सीवूड्समधील वाहतूक पोलिसांनी नो-पार्किंग झोनमध्ये पार्क केलेल्या वाहनांवर कारवाई केली. नवी मुंबईतील सीवूड्समध्ये नो-पार्किंग झोनमध्ये पार्क केल्याबद्दल सुमारे ७० वाहनांना दंड ठोठावण्यात आला. प्रत्येक वाहनाला ऑनलाईन दंड ठोठावण्यात आला. दंड आकारण्यापूर्वी, वाहतूक पोलिसांनी मालकांना त्यांची वाहने काढून टाकण्याचे आवाहन करणारी घोषणा केली. त्यानंतरही, जेव्हा लोक त्यांची वाहने घेऊन निघून गेले नाहीत, तेव्हा त्यांच्यावर ऑनलाईन दंड आकारला.

या वेळी नेरूळ वाहतूक विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहिनी लोखंडे म्हणाल्या की, लोक कुठेही निष्काळजीपणे त्यांची वाहने पार्क करतात, ज्यामुळे वाहतूक कोंडी होते आणि कधीकधी अशा पार्किंगमुळे रस्ते अपघात होतात. म्हणूनच, आम्ही सीवूड परिसरातील अनेक ठिकाणी नो पार्किंगचे फलक लावले आहेत. लोक त्यांची वाहने थोड्या वेळासाठी पार्क करतात आणि नंतर तासन्तास वाहने काढत नाहीत, ज्यामुळे स्थानिक रहिवाशांची मोठी गैरसोय होते. ७० चारचाकी वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.

भविष्यात ही समस्या सोडवली नाही तर आणखी कडक कारवाई केली जाईल, ज्यामध्ये वाहन जप्तीचा समावेश असू शकतो, असे या वेळी सांगण्यात आले.

# नेरूळ फेज २मध्ये बत्तीगुल; नागरिक संतप्त

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ फेज २ वसाहतीत महावितरणच्या वारंवार बत्ती गुलमुळे नागरिक, व्यापारी संतप्त झाले आहेत.

नेरूळ फेज २ वसाहतीत मागील तीन दिवसांपासून वारंवार महावितरणची बत्ती गुल होत असल्याने वीज ग्राहक संतप्त आहेत. मंगळवारी दुपारी साडेबारा वाजता सेक्टर ८ मध्ये झालेली बत्ती गुल सव्वा दोन वाजता अवतरली. या विभागात बत्ती गुल होण्याचे प्रकार वारंवार घडत असल्याने सामान्य नागरिक, दुकानदार यांना विविध प्रकारे सामना करावा लागत आहे. लोडशेडिंगच्या नावाखाली महावितरण सामान्य नागरिकांना वेठीस धरत असल्याचा आरोप स्थानिक वीज ग्राहक आणि शिवसेना उपशहरप्रमुख गणपत शेलार यांनी केला आहे.

महावितरणकडे परफेक्ट टेक्निशियन नाहीत. बत्ती गुलविषयी संबंधित अधिकाऱ्यास फोन केला असता अधिकारी फोन उचलत नाहीत. एखाद्या वीज ग्राहकाने मजबुरीने बिल थकवले तर कर्मचारी वीज कनेक्शन तोडण्याची कारवाई करण्यास तत्परता दाखवतात मग वारंवार बत्ती गुल होण्याच्या प्रकारावर महावितरण का तोडगा काढत नाही, असा सवाल गणपत शेलार यांनी उपस्थित केला आहे.

बत्तीगुलच्या त्रासाने त्रास लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांचे हाल होत आहेत. इथं हॉस्पिटल, लॅब आहेत उंच इमारतीतील लिफ्ट व्यवस्था वीज नसल्याने बंद असते.

> **आम्हा महिलांना वारंवार जाणाऱ्या वीज समस्यामुळे त्रास होत आहे. सद्या दिवाळीची पूर्वतयारी करण्यात आम्ही व्यस्त असताना बत्ती गुलमुळे हैराण आहोत. संबंधित अधिकाऱ्यांना संपर्क केला असता समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत.**
>
> **-संध्या इथापे**, गृहिणी, सेक्टर ८, नेरूळ

महावितरणने याकडे त्वरित लक्ष द्यावे आणि शंभर टक्के वीज बिल भरणाऱ्या वीज ग्राहकांना खंडित वीजपुरवठा करू नये अन्यथा संतप्त नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागेल, असे नागरिकांनी संतप्तपणे सांगितले.

# ज्येष्ठांसह महिलांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकविरा युवक मित्र मंडळाच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव अंतर्गत ज्येष्ठ नागरिक आणि महिला भगिनींचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.



या वेळी मंडळ स्थापन करणे सोपे असले तरी मंडळाच्या माध्यमातून समाजासाठी काम करणे, नागरिकांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, शैक्षणिक उपक्रम राबवणे हे फार कठीण आहे, मात्र गेल्या वर्षांपासून एकविरा युवक मित्र मंडळ हे काम करत आहे, याचा मला अभिमान आहे, असे गौरवोद्गार भाजपचे नेते जयंत पगडे यांनी काढले.

तक्का येथील मराठी शाळेत हा कार्यक्रम बुधवारी झाला. या कार्यक्रमाला भाजप नेते जयंत पगडे, अण्णा भगत, संदिप खुटकर, माजी नगरसेवक अजय बहिरा, संदिप बहिरा, युवानेते प्रतिक बहिरा, जगन्नाथ बहिरा, बबन कांबळे, नैनेश वाघिलकर, विनायक बहिरा, विनायक पगडे, विराज वाधिलकर, अशोक बहिरा, मनोज बहिरा, शिवा वाघिलकर, राजन बहिरा, सुनिल पगडे, वैभव पगडे आदी उपस्थित होते.



**पनवेल :** आई मित्र मंडळ आणि 'खांदा कॉलनी बॅडमिंटन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने रोहित कोळी यांच्या वाढदिवसानिमित्त बॅडमिंटन स्पर्धा आणि कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार समारंभ खांदा कॉलनी येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर तसेच जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव, वरून डांगर, संजोत शेळके, मोतीलाल कोळी, भीमराव पवार, अभिषेक भोपी आदी उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतरत्न डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर दरवर्षी १५ ऑक्टोबर हा दिवस शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागाच्या पुढाकाराने बुधवारी हा दिवस उत्साहात पार पडला.

दरम्यान, मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत, वाचनाचे महत्त्व पटवून देताना त्यांनी, आजच्या विद्यार्थ्यांचे अभ्यासाच्या व्यतिरिक्त अवांतर वाचन होणे आवश्यक आहे. अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांना अनेक संदर्भ मिळतात, त्यांची आकलन शक्ती वाढते तसेच इतरांवर आपल्या ज्ञानाचा प्रभाव टाकण्यासाठीही अवांतर वाचनाचा उपयोग होतो. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमासाठी इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे त्याचबरोबर ग्रंथपाल निलेशा पाटील, शिल्पा पाटील, सूर्यकांत घोडेकर तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते. सूत्रसंचालन अनघा भोसले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथपाल निलेशा पाटील यांच्यासह सर्व शिक्षक वृंदांनी मेहनत घेतली.



# फुंडे विद्यालयात वाचन प्रेरणा दिन



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य बी.बी.साळुंखे, उपमुख्याध्यापिका एस.डी.थोरात, पर्यवेक्षिका एस.एम.बाबर, एस.एस.पाटील, वरिष्ठ लेखनिक नितीन म्हात्रे व उपस्थित शिक्षक वृंदाच्या हस्ते डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या वेळी रुद्रा धुमाळ, श्रेया शिंदे, स्वराज पवार यांनी डॉ.अब्दुल कलाम यांचे जीवनकार्य सांगितले. सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.एन.पाटील यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व विशद केले. वाचन हे ज्ञानार्जनाचे साधन आहे.त्या मुळे ज्ञान वाढते, वाचनाने जगणे समृद्ध होते. माणसाचे व्यक्तिमत्व अनुभव संपन्न होते. स्मरणशक्ती सुधारते. तणाव कमी होतो. आणि भाषिक कौशल्ये विकसित होतात.

या वेळी विद्यालयाच्या ग्रंथपाल उपशिक्षिका मोकल आर.आर. यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. त्यामध्ये विविध प्रकारची पुस्तके ठेवण्यात आली होती. सर्व विद्यार्थ्यांनी त्या विविध पुस्तकांचे वाचन केले. तसेच प्रत्येक वर्गामध्ये विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी पुस्तकाचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नव्या म्हात्रे हिने केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक वृन्दांचे सहकार्य लाभले.

# कोकण विभागीय लोकशाही दिनी चार अर्ज प्राप्त

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली.

कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या सहा असून आलेल्या अर्जांची संख्या चार आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १० होते. त्यापैकी एक अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. आता कोंकण विभागीय स्तरावर एक अर्ज प्रलंबित आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात 'दिवाळी बाजार' उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या फॅशन अँड अपेरल डिझाईन व इंटीरियर डिझाईन विभागांतर्फे ३ ऑक्टोबर रोजी दिवाळी बाजाराचे उत्साही आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम प्रा. दीपश्री राठोड व प्रा. स्वेच्छा गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. संपूर्ण कॉलेज परिसरात उत्साह, आनंद आणि सर्जनशीलतेचे वातावरण निर्माण झाले होते.





कार्यक्रमाचे उद्घाटन विज्ञानशाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो. डॉ. बी.डी.आघाव यांच्या हस्ते झाले. त्यांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना मोठी प्रेरणा मिळाली.

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेतून तयार केलेल्या हस्तनिर्मित अॅक्सेसरीज, सजावटीच्या वस्तू, दिवे, फेस्टिव्ह डेकोर आणि स्वादिष्ट खाद्यपदार्थांच्या विविध स्टॉल्स लावल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या नवकल्पना आणि आकर्षक सादरीकरणामुळे दिवाळीचा उत्सव कॉलेजच्या प्रत्येक कोपऱ्यात उजळून निघाला.

सर्व विभागप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारीवर्गाने कार्यक्रमाला भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले, ज्यामुळे हा उपक्रम अधिक यशस्वी झाला. प्राचार्य डॉ. एस. के. पाटील सरांनीदेखील कार्यक्रमाला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांना मौल्यवान सूचना दिल्या. त्यांच्या प्रेरणादायी शब्दांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि उत्साह संचारला.

कार्यक्रमाला विद्यार्थ्यांकडून आणि प्राध्यापकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक स्टॉल्सवरील वस्तू संपूर्ण विकल्या गेल्या, ज्यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला. 'दिवाळी बाजार' या उपक्रमाने केवळ आनंद आणि उत्साह पसरवला नाही, तर विद्यार्थ्यांना त्यांची उद्योजकता, सर्जनशीलता आणि टीमवर्क प्रदर्शित करण्यासाठी एक उत्कृष्ट व्यासपीठ उपलब्ध करून दिले. शिक्षण आणि सणाचा संगम घडवणारा हा उपक्रम खऱ्या अर्थाने सी.के.टी. कॉलेजचा अभिमान ठरला.



**पनवेल : महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती अॅड. नरेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिराचा असंख्य नागरिकांनी सहभाग घेत आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली. खारघर सेक्टर १० या ठिकाणी हे मोफत आरोग्य तपासणी शिबिर झाले.**

# ओरायन मॉलमध्ये साकारला सिंधुदुर्ग किल्ला

**पनवेल : वार्ताहर**

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात किल्ल्यांचे महत्त्व खूप जास्त होते. ते फक्त संरक्षणासाठी नव्हते तर स्वराज्याच्या राजनैतिक, लष्करी आणि आर्थिक धोरणांचा आधार होते.

किल्ले ही स्वराज्याची प्रबळ सुरक्षा व्यवस्था होती, ज्यातून शत्रूंपासून स्वराज्याचे संरक्षण करणे, लष्करी कारवाया करणे आणि सैन्यासाठी आश्रयस्थान मिळवणे शक्य झाले. राजगड, रायगड यांसारख्या किल्ले राजधानी आणि प्रशासनाचे केंद्र बनले, तर सिंधुदुर्गसारखे जलदुर्ग समुद्रावरून होणाऱ्या आक्रमणांपासून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचे होते. याच सिंधूदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती ओरायन मॉलमध्ये उभारण्यात आली आहे.



दिवाळीत किल्ले बनविण्याची परंपरा आजही बच्चे कंपनी जोपासत आहे. शहरी भागात हि परंपरा काही प्रमाणात लुप्त होत चालली असताना ओरायन मॉल ने हि संस्कृती जपत भव्य सिंधुदुर्ग किल्ला मॉलमध्ये उभारला आहे. दिवाळीनिमित्त मॉलमध्ये येणाऱ्या नागरिकांमध्ये आपल्या संस्कृतीचा जागर व्हावा यादृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर यांनी दिली.

मॉल संस्कृती जरी पाश्चिमात्य संस्कृतीचा भाग असला तरी आमच्यामार्फत सांस्कृतिक कार्यक्रम आम्ही याठिकाणी राबवून संस्कृतीचे जतन करण्याचे आम्ही प्रयत्न करतो, असे मनन परुळेकर यांनी सांगितले.

> **इतिहासाला उजाळा**
>
> स्वराज्याचे स्थापत्यविषारद हिरोजी इंदुलकर यांनी १५ नोव्हेंबर १६६४मध्ये या किल्ल्याच्या उभारणीस सुरुवात केली. ४८ एकरातील या किल्ल्यात किती कामगारांनी काम केले? किल्ल्यावर कोणी कोणी हल्ले केले आदी सर्व माहिती या देखाव्याच्या दर्शनी भागात दिली आहे.

# पुस्तकी ज्ञानाएवढेच सामान्य ज्ञानही महत्त्वाचे

## गव्हाण विद्यालय चेअरमन अरुणशेठ भगत यांचे पालक सभेत प्रतिपादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासक्रमातील पुस्तका इतकेच सामान्य ज्ञानालाही महत्त्व देऊन आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिक रूंद कराव्यात, असे आवाहन अरुणशेठ भगत यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षक पालक मेळाव्यामध्ये अध्यक्षस्थानावरून बोलताना अरुणशेठ भगत यांनी प्रतिपादन केले.



नुकत्याच झालेल्या चाचणी परीक्षेतील गुणांच्या अनुषंगाने त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला. या वेळी अरुणशेठ भगत यांचेसह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी,गव्हाण ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच विजयनाना घरत,ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले, नववी व दहावीचे सर्व वर्गशिक्षक अनुक्रमे गीतांजली म्हात्रे, शितलकुमार म्हात्रे, चारुशीला ठाकूर, प्रशांत परदेशी, सागर रंधवे व संदीप भोईर तसेच विषय शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी अध्यक्षांनी विद्यार्थ्यांना बोलते करून प्रगत गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या सवयी व त्यांच्या यशाचे रहस्य तसेच अप्रगत विद्यार्थ्यांनी यशस्वीतेकडे वाटचाल करण्यासाठीच्या उपाययोजना याविषयीच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी प्रास्ताविक केले, तर सर्व पालकसभांचे सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले.

# मुरुडमध्ये माकडांचा उच्छाद; सारेच त्रस्त



मुरुड : प्रतिनिधी

मुरुडमध्ये माकडांनी उच्छाद मांडला आहे. या माकडांच्या वाढलेल्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. आंबा, काजू बागांसह फळपिकांचे नुकसान करणाऱ्या माकडांना पकडण्याची मोहीम आंबा हंगाम सुरू होण्याआधी करण्यात येणे गरजेचे आहे.

रायगडात मुरुड, रोहा, श्रीवर्धन, दांडगुरी, खारआंबोली परिसरातील बागायतदार व शेतकरी माकडांच्या त्रासाला कंटाळे आहेत. मुरुडमध्ये नारळाच्या झाडाला कोय फुटून छोटे नारळ बाहेर येताच माकडे खातात. त्यामुळे नारळ मोठाच होत नसल्याने नुकसान होत आहे. येणाऱ्या थंडीत आंब्याला मोहोर येणार आहे. त्यानंतर आंबा कैरी रुपात असताना माकडांचे वादळ आले तर आंब्याचे पीक नष्ट होईल. ते लक्षात घेता वनखात्याने आताच उपाययोजना करावी, अशी मागणी बागायतदार करत आहेत.

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आंबा आणि काजू याबरोबर इतर फळांचे उत्पन्न घेतले जाते. याबरोबर भाजीपाला व भातशेती कोकणात केली जाते, मात्र गेली काही वर्ष फळबागा आणि शेतीपिकांचे माकडांकडून मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी आणि बागायतदार हवालदिल झाले आहेत. दरवर्षी त्याला मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे, परंतु हा प्रश्न सोडवण्यासाठी दांडगुरीचे आदर्श शेतकरी शरद खेडेकर यांनी वनखात्यात अनेक वेळा तक्रार करूनही वनखात्याकडून कारवाई होताना दिसत नाही. बागायतदारांनी माकड, वानरांपासून होणाऱ्या उपद्रवाबद्दल आवाज उठवण्याची गरज आहे.

वनखात्याने माकडांच्या उपद्रवासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. मुरुड शहरात बाजारपेठेत रोज सकाळी ७ वाजता घरच्या छपरावर २०-२५ माकडे असतात. एक झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारत कर्कश आवाज करत व घराची खिडकी उघडी असली तर घरातील खाण्याच्या वस्तू उचलू खातात. घरातील महिला लहान मुले भयभीत झालेत. नागरिकांना दरवाजे बंद करून घरी बसावे लागत आहे.

**मुरुड शहरात व बाजारपेठेत माकडांचा उपद्रव वाढला आहे. घराबाहेर कोणतीही खाद्यवस्तू उन्हात सुकण्यासाठी टाकल्यास माकडे येऊन खाऊन फस्त करतात. घरच्या छपरावर येऊन सिमेंट पत्रे फोडतात. त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला, तर अंगावर येऊन नखे मारतात.**

**-राजश्री सादरे, गृहिणी, मुरुड**

**मुरुड खारआंबोली, वाणदे, आगरदांडा परिसरात माकडांप्रमाणे डुकरांचाही त्रास आहे. माकडे आणि डुकरांचे झुंड शेतात येऊन उभे पीक आडवे करून जातात.**

**-मनोज कमाने, शेतकरी, मुरुड**

# मुरूड जंजिरा पालिकेच्या कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड!

## २० हजार रुपये सानुग्रह अनुदान जाहीर



मुरुड : प्रतिनिधी

मुरूड जंजिरा नगर परिषद प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी नगर परिषद कर्मचारीवर्गासाठी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मोठी आनंदवार्ता दिली आहे. नगर परिषदेतील सर्व आस्थापनेवरील कर्मचारी यांना २० हजार रुपये इतके सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

ही घोषणा होताच नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पालिका कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा मिळावा तसेच त्यांचा मनोबल वाढावा या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासकांनी सांगितले.

मुख्याधिकारी यांनी पुढे सांगितले की, नगर परिषदेचे कर्मचारी वर्षभर विविध शासकीय योजना व सार्वजनिक सेवा प्रामाणिकपणे पार पाडत असतात. त्यांच्या मेहनतीची दखल घेत ही दिवाळी खास बनविण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे.

नगर परिषदेच्या या निर्णयाचे मुरुड जंजिरा नगर परिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश आरेकर यांनी स्वागत केले असून प्रशासक तथा मुख्याधिकारी यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहे.

# चौल-आग्राव रस्त्याच्या नूतनीकरणास अखेर प्रारंभ



रेवदंडा : प्रतिनिधी

चौल-आग्राव रस्ता नूतनीकरण कामास अखेर प्रारंभ झाला असून सुधाकर इंफ्राटेक यांच्यामार्फत काम करण्यात येत आहे.

चौल ते आग्राव रस्त्याची ऐन पावसाळ्यात पुरती दयनीय अवस्था झाली होती. सर्वत्र खड्डेच खड्डे व खड्ड्यांची तळी झाली होती. आता चौल-आग्राव या रस्त्याचा नव्याने नूतनीकरणाचा भूमिपूजन कार्यक्रम झाला. या वेळी शिवसेनेत नुकतेच प्रवेश केलेले सचिन राऊळ यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामस्थांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रस्ता नूतनीकरणाचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शिवसेनेचे कार्यकर्ते तसेच चौल ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

या रस्ता नूतनीकरणासाठी सचिन राऊळ यांनी पाठपुरावा केला असल्याचे आणि आमदार महेंद्र दळवी यांनी यासाठी विशेष लक्ष दिले. त्यामुळेच रस्ता नूतनीकरणाचे काम सुरू झाले असल्याचे शिवसेनेचे प्रशांत शेणवईकर यांनी सांगितले.

# रायगडात ॲट्रोसिटी गुन्हे घडण्याचे प्रमाण घटले -गोरक्ष लोखंडे



अलिबाग : प्रतिनिधी

रायगड जिल्ह्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये (ॲट्रोसिटी) गुन्हे घडण्याचे प्रमाण घटले आहे. रायगड जिल्ह्यात चालू वर्षात सप्टेंबर महिन्यापर्यंत या कायद्यान्वये चार गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. या वर्षात एकूण ३१ गुन्हे नोंदविले गेले आहेत. या सर्व प्रकरणांमध्ये पोलिसांनी सक्षमपणे काम करावे. महाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत २०२४ साली घडलेल्या प्रकरणात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून त्याला अटक करावी, अशा सूचना देण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी मंगळवारी (दि. १४) पत्रकार परिषदेत दिली.

रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, रायगडचे सहाय्यक समाजकल्याण आयुक्त सुनील जाधव या वेळी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातील नगर परिषदा, नगरपालिका, नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात येणाऱ्या मागासवर्गीयांसाठीच्या विविध योजना, नोकरभरती, अनुकंपा तत्वावरील प्रकरणे, समाजकल्याण विभागाकडून येणाऱ्या निधीचा वापर, आर्थिक दुर्बल घटकांवर होणारा खर्च, दलित वस्ती, रमाई आवास घरकुल योजना, लाड पागे प्रलंबित प्रकरणे याबाबत महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांनी मंगळवारी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी यांच्याकडून आढावा घेतला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

रायगड जिल्ह्यात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमा अन्वये गुन्हे घडण्याचे प्रमाण घटले आहे. चालू वर्षात नऊ महिन्यांमध्ये चार गुन्हे नोंदविण्यात आले आहे. १९९५ ते २०२५ या कालावधीत जिल्ह्यात ७८९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

मागासवर्गीयांसाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी रायगड जिल्ह्यात चांगल्या प्रकारे केली जात आहे. समाजकल्याण विभागाचा निधीचा वापरदेखील योग्य प्रकारे केला जाता आहे. मी राज्यातील २६ जिल्ह्यांचा आढावा घेतला. रायगड हा २७वा जिल्हा आहे. इतर जिल्ह्यांच्या तुलनेत रायगड जिल्ह्याची कामगिरी समाधानकारक असून सर्व योजना चांगल्या प्रकारे राबविल्या जात आहेत, असे गोरक्ष लोखंडे यांनी सांगितले.

# माणगावात 'दिवाळी पहाट'

माणगाव : प्रतिनिधी

संगीतप्रेमी म्युझिकल ग्रुपतर्फे शुक्रवार, १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ ते ८.३० या वेळेत ज्योती बंगला, ज्योती सुरेश बुटाला, मुंबई-गोवा हायवे अंबिका हार्डवेअर शेजारी, माणगाव या स्थळी सूर तेच छेडीता...या बहारदार दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिवाळी पहाट कार्यक्रमात पहाटेच्या निसर्गरम्य अशा मनमोहक वातावरणात रसिक प्रेक्षकांना सूर तेच छेडीता.... कार्यक्रमाच्या अनुषंगाने माणगावमधील नामवंत गायकांचा सदाबहार ताल, सूर; त्याला उत्तम अशा तबला, हार्मोनिअम व संगीताची जोड या त्रिवेणी संगमातून दिवाळी पहाटची मेजवानी उपस्थित रसिक प्रेक्षकांना मिळणार आहे.

या कार्यक्रमात गायक राजेंद्र पोवार, ॲड. मोहन मेथा, डॉ.श्रीकांत वैद्य, आशा राऊत, डॉ. चंद्रशेखर साकोलीकर, डॉ. सचिन चव्हाण, डॉ. अक्षरा चव्हाण, स्नेहल परांजपे, दीक्षा देसाई, डॉ. सुकेशनी डोंगरे, रजनी शेट, धनश्री मेहता, डॉ. स्नेहा राऊत, वादक अनंत करंदीकर, रायगडभूषण राकेश मेस्त्री यांच्या सुरेल मैफिलीने दिवाळी पहाट कार्यक्रम रंगणार आहे.

या कार्यक्रमाचा माणगावकर रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# लांढर येथे रक्तदान शिबिरास प्रतिसाद

धाटाव : प्रतिनिधी

माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून युवक राष्ट्रवादी काँग्रेस धाटाव विभागातर्फे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष लांढर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन सोमवारी करण्यात आले होते. अलिबाग जिल्हा शासकीय रक्तपेढी या ठिकाणी उपलब्ध होती.

या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस विजय मोरे यांच्या हस्ते झाले. या वेळी राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, जिल्हा उपाध्यक्ष शंकर भगत, रोहिदास पाशिलकर, तालुका उपाध्यक्ष अनिल भगत, वरसे विभाग अध्यक्ष दत्ताजी चव्हाण, महेश बामुगडे, युवक राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष जयवंत मुंढे, वरसे माजी सरपंच अमित मोहिते, रूपेश बामुगडे, वाशी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सतीश भगत, सदस्य अंतोष शिर्के, विठोबा बाकाडे, तळाघर ग्रामपंचायतीचे सरपंच नथुराम माने, मयूर मुंडे, विजय भगत, नरेश गायकर, संदेश भगत, सागर भगत, महेश तुपकर आदी उपस्थित होते.

या शिबिरात एकूण ३५ रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या. शिबिराचे यशस्वी नियोजन युवक कार्याध्यक्ष राम महाडिक व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.



# कालवण येथे कामांचा शुभारंभ

माणगाव : बातमीदार

माणगाव तालुक्यातील कालवण-इंदापूर परिसरात विविध विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यात सोमजाई मंदिराचा जीर्णोद्धार, व्यायामशाळेचे उद्घाटन तसेच बौद्ध विहाराचे भूमिपूजन या तीन महत्त्वाच्या कामांचा समावेश होता.

या सर्व कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन राज्याचे कॅबिनेटमंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमावेळी कालवण परिसर भगव्यामय वातावरणात न्हाऊन निघाला होता. ढोल-ताशांच्या गजरात, भगवे फेटे बांधून महिला भगिनी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसेना आणि युवा सेनेचे पदाधिकारी, आजी-माजी लोकप्रतिनिधी तसेच मान्यवरांची कार्यक्रमाला उपस्थिती लाभला.

# संतोष मोहिते यांची प्रशासकीय बदली

माणगाव : बातमीदार

रायगड जिल्हा परिषद शाळा वावे तर्फे निजामपूर येथे शिक्षक संतोष बबन मोहिते यांची प्रशासकीय बदली झाल्यामुळे निरोप समारंभ भावनिक वातावरणात पार पडला.

संतोष मोहिते हे सहाय्यक शिक्षक सन २०१६पासून रायगड जिल्हा परिषद शाळा वावे तर्फे निजामपूर या ठिकाणी कार्यरत होते. त्यांना त्या ठिकाणी एकूण नऊ वर्षे तीन महिने इतकी सेवा त्यांनी केलेली आहे. त्यांची प्रशासकीय बदली रायगड जिल्हा परिषद शाळा आडघर या ठिकाणी झालेली आहे. त्यानिमित्ताने ग्रामस्थ मंडळ, माजी विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती; त्याचप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक यांच्या सहकाऱ्यांनी संतोष मोहिते यांचा निरोप समारंभ कार्यक्रम वावे तर्फे निजामपूर शाळा या ठिकाणी आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शुभांगी राजेंद्र शिर्के, राजेंद्र शिर्के, माजी सरपंच ग्रुप ग्रामपंचायत उणेगांव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापक गजानन देवकर यांनी मोहिते सरांच्या शिक्षणक्षेत्रातील कार्याचा गौरव केला. शेवटी शेवटी संतोष मोहिते यांना व त्यांच्या सौभाग्यवती सारिका मोहिते ग्रामसेवक यांना शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, नियोजन मुख्याध्यापक देवकर यांनी केले.

# सरीवर सरी चित्रपट लवकरच येणार



पाली : प्रतिनिधी

सुधागड तालुक्यातील आत्मोन्नती विद्यामंदिर जांभुळपाडामध्ये पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण घेतलेला एक तरुण पुढे जाऊन चित्रपट सृष्टीत निर्माता म्हणून नावलौकिक मिळवेल याची भनकसुद्धा त्याच्यासोबत एकाच बाकावर बसलेल्या मित्रांना नव्हती. आज एक उत्कृष्ट आणि सुप्रसिद्ध चित्रपट निर्माता म्हणून अनंत सीताराम जाधव यांची ओळख ही संबंध मराठी चित्रपटसृष्टीत आहे.

मूळचे उस्मानाबाद जिल्ह्यातील अनंत जाधव हे सुधागड तालुक्यातील विजयनगर येथे आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होते. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जांभुळपाडा येथील आत्मोन्नती विद्यामंदिर येथे झाले. ते पुढील वाटचालीसाठी मुंबईला गेले. चित्रपट निर्मिती संबंधित शिक्षण आणि कार्यशाळांमध्ये त्यांनी भाग घेतला. छायाचित्रण, लेखन, दिग्दर्शन, संपादन आणि आर्थिक व्यवस्थापन यांसारखी कौशल्ये त्यांच्या अंगी असल्याने ते चित्रपट निर्माता म्हणून यशस्वी झाले.

निर्माता अनंत जाधव यांनी अनेक मराठी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. आगामी काळात सरी वर सरी हा त्यांचा मराठी चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात तरुणांच्या मनात घर करणारी महाराष्ट्राची सुप्रसिद्ध लावणी नर्तिका व सध्या अनेक मराठी चित्रपट सृष्टीतील कलाकारांसोबत काम करत असलेली गौतमी पाटील ही अभिनेत्रीच्या मुख्य भूमिकेत दिसणार आहे. याबाबत तिच्यासोबत चित्रपटाचा करारनामादेखील करण्यात आला आहे.

या वेळी निर्माते अनंत जाधव यांच्यासमवेत त्यांचे वर्गमित्र व सुधागड तालुक्यातील विजयनगर येथील रहिवासी निलेश काळभोर व गोपीनाथ खापरे हेही उपस्थित होते, तर महेश कुमार वनवे अभिनेता म्हणून मुख्य भूमिकेत असणार आहेत. अभिनेत्री गौतमी व अभिनेता महेश यांची अनोखी जोडी सरीवर सरी या चित्रपटात पहायला मिळणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे.

# अपूर्वा जंगम यांना पुरस्कार

माणगाव : प्रतिनिधी


माणगाव येथील आदर्श शिक्षिका अपूर्वा अमोल जंगम यांना रायगड जिल्हा परिषद अलिबाग प्राथमिक शिक्षण विभागातर्फे सन २०२४-२५ या वर्षातील आदर्श शिक्षक पुरस्काराने आरसीएफ कॉलनी हॉल, कुरूळ, अलिबाग येथे झालेल्या कार्यक्रमात राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

शिक्षिका अपूर्वा जंगम या माणगावमधील सामाजिक, शैक्षणिक, कार्यात अग्रेसर असणाऱ्या गुणवंत शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. सध्या त्या माणगाव तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा कशेणे या ठिकाणी सहाय्यक शिक्षिका म्हणून सेवेत कार्यरत आहेत. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# माथेरानच्या मिनीट्रेनची पर्यटकांना प्रतीक्षा

माथेरान : बातमीदार

पावसाळ्याच्या चार महिन्यांच्या विश्रांतीनंतर दरवर्षी मिनीट्रेन दसरा किंवा १५ ऑक्टोबर या दिवशी सुरू होते, मात्र यंदाच्या वर्षी मध्य रेल्वेने मिनीट्रेनला अजून हिरवा कंदील दाखवला नसल्याने अजूनही मिनीट्रेन सुरू झाली नसून बंदच आहे. त्यामुळे आबालवृद्धांच्या आवडीची नॅरोगेजवर धावणारी माथेरानची राणी नेरळ-माथेरान मिनीट्रेन केव्हा सुरू होणार याकडे पर्यटकांचे लक्ष लागले असून विचारणा केली जात आहे.



जगप्रसिद्ध माथेरान पर्यटनस्थळाचे मुख्य आकर्षण म्हणून मिनीट्रेनकडे पाहिले जाते. माथेरानच्या आर्थिक जडणघडणीत मिनीट्रेनचा मोठा वाटा आहे. नॅरोगेजवर चालणारी ट्रेन असल्याने या माथेरानच्या राणीला खूप विशेष महत्त्व आहे. दरवर्षी पावसाळ्यात जूनपासून सप्टेंबर महिन्यापर्यंत सुरक्षेच्या कारणास्तव मिनीट्रेन बंद करण्यात येत असते. माथेरानच्या माथ्यावर पाऊस जोरदार कोसळत असतो. यामुळे पावसाळ्यात घाटात दरडी कोसळण्याच्या घटना घडत असतात. परिणामी मध्ये रेल्वेकडून प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने माथेरान-नेरळ मिनीट्रेन मार्ग बंद ठेवण्यात येत असतो.

दसरा सणाच्या मुहूर्तावर किंवा १५ ऑक्टोबर अगोदर घाट सेक्शनमधील कामे पूर्ण करून नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरू केली जाते, मात्र १५ ऑक्टोबर दिवस उजाडला तरीदेखील नेरळ-माथेरान मिनीट्रेन सुरू झाली नाही. मिनीट्रेन कधी सुरू होणार असा प्रश्न पर्यटकांकडून स्थानिक नागरिकांकडून तसेच मिनीट्रेनप्रेमी यांच्याकडून विचारला जात आहे. आता लवकरच दिवाळी पर्यटन हंगाम सुरू होणार असून माथेरानच्या राणीची सफर करण्यासाठी पर्यटकांची मांदियाळी येथे पहावयास मिळणार आहे. दिवाळी पर्यटन हंगामपूर्वी मिनीट्रेन सुरू व्हावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत. सध्या स्थितीत अमनलॉज स्थानक ते माथेरान रेल्वेस्थानकापर्यंत शटलसेवा सुरळीत सुरू आहे.

# ‘मिशन ऑस्ट्रेलिया’साठी टीम इंडिया रवाना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिज दौऱ्यानंतर भारतीय क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेसाठी सज्ज झाला आहे. १९ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलिया दौऱ्याचा आरंभ होणार आहे. या महत्त्वपूर्ण दौऱ्यात भारताला तीन एकदिवसीय (वनडे) आणि पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका खेळायची आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय संघ बुधवारी (दि.१५) सकाळी नवी दिल्लीहून रवाना झाला.

वेस्ट इंडिजला दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-०ने पराभूत केल्यानंतर टीम इंडिया आता ऑस्ट्रेलियासाठी रवाना होणार आहे. एकदिवसीय मालिकेसाठी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांसारख्या दिग्गज खेळाडूंचे संघात पुनरागमन होणार आहे. रोहित आणि विराटने टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असल्याने चाहत्यांना त्यांना पुन्हा एकदा मैदानावर पाहण्याची तीव्र उत्सुकता आहे.



टीम इंडियाचा पुढील सामना १९ ऑक्टोबर रोजी आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्याची सुरुवात एकदिवसीय मालिकेने होईल आणि मालिकेतील पहिला सामना पर्थ येथे खेळला जाईल.

वृत्तानुसार संघ १५ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियासाठी रवाना होईल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी बीसीसीआयने आधीच संघाची घोषणा केली आहे.

प्रथम तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका होईल, ज्यातील पहिला सामना १९ ऑक्टोबर रोजी होणार आहे. त्यानंतर २३ आणि २५ ऑक्टोबर रोजी उर्वरित दोन सामने होतील. एकदिवसीय मालिका संपल्यानंतर पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेचा थरार रंगेल.

### रोहित, विराटकडे नजरा

टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी या झटपट क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. इंग्लंड दौऱ्यापूर्वी त्यांनी कसोटी क्रिकेटमधूनही बाहेर राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे हे दोन्ही दिग्गज खेळाडू आता फक्त एकदिवसीय फॉरमॅटचे खेळाडू बनले आहेत. म्हणूनच त्यांच्याकडे सर्वांच्या नजरा असणार आहेत.



## राज्य बॅडमिंटन स्पर्धेत रायगडच्या मुलींना विजेतेपद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन स्पर्धेत रायगडच्या अंडर-१७ मुलींनी चमकदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. ही स्पर्धा अहिल्यानगर येथे झाली.

बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगड (बीओआर) मुलींच्या संघाने योनॅक्स-सनराई आमदार स्व. अरुणकाका बालभिमराव जगताप स्मृती महाराष्ट्र राज्य सब-ज्युनिअर आंतरजिल्हा अंडर १७ आणि अंडर १५ बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

रायगड संघाकडून उत्कृष्ट कौशल्य, संघभावना आणि जिद्दीने खेळ करणाऱ्या खेळाडूंमध्ये गाथा सूर्यवंशी, अनुष्का एप्टे, आयुषी निरवाण, ऋधिमा म्हात्रे, अनरिया सिंग आणि अनन्या सिंग यांचा समावेश होता. या यशामागे प्रशिक्षक श्रीशैल मिटकरी आणि संघव्यवस्थापक प्रशांत मुखर्जी यांचे मार्गदर्शन आणि मेहनत मोलाची ठरली.

संघाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर तसेच बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष परेश ठाकूर, उपाध्यक्ष रवींद्र भगत, शिवकुमार करयिल यांनी अभिनंदन केले.



## ‘सीकेटी’च्या रोहन वाजेचे राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय वुशू स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील रोहन सुरेश वाजे याने तृतीय क्रमांक पटकावला.

स्पर्धा छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय क्रीडा संकुल येथे झाली. रोहन वाजे याच्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे व स्वाती पाटील, क्रीडा शिक्षक अरुण पाटील, मनोज पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जलतरणपटू हसन शेखचा सुवर्णपदकांचा ‘षटकार’

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील जलतरणपटू व प्रशिक्षक हसन शेख याने सातव्या नॅशनल मास्टर्स अक्राटिक चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत सहा सुवर्णपदके जिंकून महाराष्ट्राचा मान वाढविला आहे. ही स्पर्धा नुकतीच आंध्र प्रदेशातील गुंटूर येथे झाली.



स्पर्धा मास्टर्स अक्काटिक स्विमिंग असोसिएशनतर्फे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत हसन शेख यांनी महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करत विविध जलतरण स्पर्धांमध्ये भाग घेतला आणि सुवर्णपदकांचा षटकार मारला. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे. यापूर्वीही शेख यांनी मंगळुरू (कर्नाटक) येथे झालेल्या नॅशनल यूथ स्विमिंग चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदके पटकावली होती.

## मोहम्मद सिराज ठरला २०२५मधील सर्वाधिक कसोटी बळी घेणारा गोलंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने २०२५ या वर्षात सर्वाधिक कसोटी बळी घेण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. या कामगिरीसह तो या वर्षात कसोटीत सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहचला आहे.



या विक्रमासह सिराजने झिम्बाब्वेचा गोलंदाज ब्लेसिंग मुजरबानीला मागे टाकले आहे. ही कामगिरी त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात केली. विंडीजच्या शाई होपला बाद करून सिराज या वर्षात कसोटीत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला.

दिल्ली कसोटी सामन्यातील दोन्ही डावांत मिळून सिराजने तीन बळी घेतले आहेत. या तीन बळींच्या जोरावर तो २०२५मध्ये सर्वाधिक कसोटी बळी घेणारा गोलंदाज ठरला आहे. या वर्षातील त्याच्या बळींची संख्या आता ३७ झाली आहे. यासोबतच त्याने ३६ बळी घेतलेल्या मुजरबानीला मागे टाकले.

सिराजने या वर्षात आतापर्यंत आठ कसोटी सामन्यांच्या १५ डावांत ३७ बळी घेतले आहेत. यामध्ये त्याने दोन वेळा पाच आणि दोन वेळा चार विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी ७० धावांत सहा बळी ही आहे. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मुजरबानीने नऊ सामन्यांत ३६ बळी घेतले आहेत, ज्यात त्याने तीन वेळा पाच बळी घेण्याची कामगिरी केली आहे.

## सार्थक म्हामुणकरची राज्य तिरंदाजी स्पर्धेसाठी निवड

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव येथील गणेश यशवंत वाघरे विद्यालयातील इयत्ता सातवीचा विद्यार्थी सार्थक सुनील म्हामुणकर याने विभागीय स्तरावरील तिरंदाजी स्पर्धेत रौप्यपदक पटकावले. त्यामुळे त्याची राज्यस्तरीय तिरंदाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



सार्थकने कल्याण येथील बी.के. बिर्ला कॉलेजमध्ये आयोजित कोकण विभागीय तिरंदाजी स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांच्या गटात रौप्यपदक मिळविले. त्यामुळे त्याची यवतमाळ येथे २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय तिरंदाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, नितीन बामगुडे, गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे चेअरमन अरुण पवार, मुख्याध्यापिका मनीषा मोरे आणि शिक्षकांनी सार्थकचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## ७० वर्षीय ॲथलिट उत्तम मानेंची पदकांची हॅट्ट्रिक



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईच्या सानपाडा येथील ७० वर्षीय खेळाडू उत्तम माने यांनी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत दोन सुवर्ण आणि एक कांस्यपदक जिंकले आहे.

गुजरातमधील सुरत येथे वेटरन स्पोर्ट्स ॲण्ड गेम्स फेडरेशनच्या वतीने चौथ्या राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातून दोन हजारहून अधिक खेळाडू सहभागी होते. ७०हून अधिक वयोगटात उत्तम माने यांनी चार बाय शंभर मीटर रिले शर्यतीत दोन सुवर्णपदके, तर वैयक्तिक लांब उडी स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त केले. या स्पर्धेत तीन पदकांवर नाव कोरत मानेंनी हॅट्ट्रिक नोंदवली.त्यांचे अभिनंदन होत आहे.

## जोशना चिनप्पाला जपान ओपन स्क्वॅश स्पर्धेचे विजेतेपद

**योकोहामा (जपान) : वृत्तसंस्था**

दोन वेळा आशियाई विजेती ठरलेली जोशना चिनप्पा हिने योकोहामा येथे आयोजित जपान ओपन स्क्वॅश स्पर्धेचे महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले.

जागतिक क्रमवारीत ११७व्या स्थानावरील आणि स्पर्धेत बिगरमानांकित असलेल्या ३९ वर्षीय जोशनाने अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत ५३व्या स्थानावर असलेल्या इजिप्तच्या हाया अलीला ११-५, ११-९, ६-११, ११-८ अशा फरकाने पराभूत करून पीएसए चॅलेंजर स्पर्धेतील जेतेपदावर आपली मोहोर उमटवली.


हाया अलीविरुद्ध चिनप्पाची ही दुसरी लढत होती. यापूर्वी याच वर्षी बर्मुडा येथील दुसऱ्या फेरीत त्यांचा सामना झाला होता. यात भारतीय खेळाडूला ११-८, १०-१२, ५-११, ११-९, ११-८ असा पराभव पत्करावा लागला होता.

## आयसीसी क्रमवारीत स्मृती मानधना अव्वल स्थानी कायम

### ■ एलिसा हिलीची चौथ्या स्थानी झेप

**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसीने नुकतीच एकदिवसीय क्रमवारीत भारतीय फलंदाज स्मृती मानधना महिला एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानी कायम आहे. दुसरीकडे ऑस्ट्रेलियाची कर्णधार एलिसा हिलीने तब्बल नऊ स्थानांची मोठी झेप घेत थेट चौथ्या स्थानावर कब्जा केला आहे. हिलीने विश्वचषकात भारताविरुद्धच्या सामन्यात दमदार शतक ठोकत ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला होता.



स्मृती मानधनाचे रेटिंग ७९३ आहे. तिच्या पाठोपाठ नॅट सायव्हर-ब्रंट (७४६) आणि बेथ मूनी (७१८) अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

या क्रमवारीत दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोल्वार्टलाही फायदा झाला असून तिने तीन स्थानांची प्रगती करत पाचवे स्थान गाठले आहे. न्यूझीलंडची सोफी डिवाइन दोन स्थानांची सुधारणा करत सहाव्या क्रमांकावर पोहचली आहे.

ऑस्ट्रेलियाच्या एलिस पेरी आणि ॲश्ले गार्डनर यांना मात्र क्रमवारीत नुकसान सहन करावे लागले आहे. पेरी एका स्थानाने घसरून सातव्या क्रमांकावर पोहचली, तर गार्डनर तीन स्थानांनी खाली येत आठव्या क्रमांकावर आली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com